

शिखांच्या-राहं!
लेखक—
दा.ब.दांडेकर
रमेश

[विद्यार्थ्यांकरितां ऐतिहासिक संवाद]

शिखांचा-शह

अथवा

व्यासघाटचा होळकर-इंग्रज तह

ख्रि. शक १८०६

लेखक :—दा. ब. दांडेकर

शालिवाहन शक १८६१.

दांडेकर बंधू पुस्तकालय

पुस्तक विक्रेते, मुद्रक आणि प्रकाशक

इन्दूर शहर.

(किंमत बारा आणे.)

मुद्रक—न. र. दलाल
सहकारी मुद्रणालय, इंदूर.

विषय निरूपण

इतिहासाचार्य श्री. गोविंद सखाराम सरदेसाई यांनी खि. शक १९३८ एप्रिल महिन्याच्या किर्लोस्कर मासिकांत " संधी गमावली " हा लिहिलेला ऐतिहासिक लेख मी वाचला. शिंदे-होळकरांची समक्ष भेट सबळगड येथें मध्यस्थांनीं महत्प्रयासानें साधली. अहंकार, अविश्वास आणि स्वार्थ यापायीं उभयताही ग्रस्त झाले होते; म्हणून हा भेटीचा बार फुसका ठरला. सबळगडाच्या भेटीनंतर पुढें घडलेला यशवंतराव होळकराच्या चरित्राचा भाग संवादरूपानें जनतेसमोर ठेवीत आहे. यशवंतरावाचे सैन्य येथून पंजाबात व्यासघाटापाशीं कसे पोहोंचलें, याचे सविस्तर वर्णन पहिल्या प्रवेशांत आहे. इंग्रजी पलटणीशी लढाई देण्याच्या हेतूनें यशवंतरावानें आपल्या सैन्याची व्यूह रचना केली, आणि तसाच एकाकी अमृतसरात जाऊन तो पंजाबच्या रणजीतसिंहाला भेटला. इंग्रजांना त्यानें शिखांचा*शह कसा

---

* **शिखांचा-शह**:—शह म्हणजे गड्याला खो देणें, पुढें करणें, कार्य प्रवृत्त करणें. इंग्रजाविरुद्ध शीख सत्तेचें साहय्य मिळवून त्यांची उठावणी करण्याचा डाव यशवंतराव होळकरानें मोठ्या चातुर्यानें टाकला होता. अशाच प्रकारें शीखांची उठावणी दुसऱ्यांदा करण्यासाठीं तेरा वर्षा-नंतर नागपूरचा भोंसला अप्पासाहेब राजा संसारचन्द्राला आळविण्यासाठीं खि. शक १८१९ ते १८२२ पावेतों गुप्तपणें कोट-कांगड्यांत रहात होता. होळकराप्रमाणें त्याच्याजवळ सैन्यबळ नव्हतें: पण आमिष दाखविण्यास अप्पासाहेबानें मोठें द्रव्यबल बरोबर नेलें होतें. प्रयत्न फसल्यावर अप्पा-साहेब जोधपुरकरांच्या आश्रयाखालीं जाऊन दडला; आणि खि. शक १८४१ च्या सुमारास स्वजनांच्या स्मृति पटलावरून पुसटलेला हा अभागी भोंसला कालवश झाला.

दिला, याचे समग्र वर्णन दुसऱ्या प्रवेशांत आहे. व्यासघाटाजवळ झालेल्या होळकर–इंग्रज तहाचे वर्णन तिसऱ्या प्रवेशांत आहे. यशवंतराव होळकराच्या पुरुषार्थ-कालाचा हा शेवटचा प्रसंग समजण्यास त्याच्या चरित्राची रूपरेखा येथें देणें योग्य होईल; म्हणून खि. शक १८०६ पावेतों यशवंतरावाच्या चरित्राचा संक्षिप्त आराखडा खालीं दिला आहे.

एकोणीसाव्या शतकाच्या अखेरीला भारतवर्षांतील साम्राज्याच्या वर्चस्वासाठीं मराठे, मुसलमान, शीख आणि इंग्रज आपापल्या परीनें झटत होते. बंगाल व बिहार बळकावून पूर्वेकडून इंग्रज उत्तर हिंदुस्थानाला ग्रासू पहात होता. पण महादजी शिंद्याच्या प्रभावानें इंग्रजाना तात्पुरता पायबंद बसला होता. अशा प्रसंगी मराठी साम्राज्याचे मुख्य आधारस्तंभ काळानें एकामागून एक ओढून नेले. खि. शक १७९३ त थेऊर येथें हरिपंत फडक्याच्या निधनानें नाना फडणीसाचा लष्करी हात गळून पडला. मराठी साम्राज्याचे दाक्षिणेकडील हितसंबंध हरिपंत फडके राखीत असत. दुसरेच वर्षी पाटील बाबा-महादजी शिंदे वानवडीस निवर्तले. मराठेशाहीचा भगवा झेंडा त्यांनीं स्वपराक्रमानें उत्तर हिंदुस्थानांत फडकत ठेविला होता. या आघातांनीं मराठी साम्राज्य कमकुवत झाले असे समजून निजामाच्या वल्गना चालू झाल्या. या प्रसंगी नानाफडणीसानें मराठे सरदारांची एकी मोठ्या बुद्धिचातुर्यानें साधली. मराठी सैन्याने निजामाला खर्ड्यांच्या रणक्षेत्रावर लोळविले. आवळ्याची बांधलेली मोट विखुरावी त्याप्रमाणें तात्पुरता साधलेला हा मराठे सरदारांचा संघ पुढे लवकरच फुटला. खि. शक १७९५ त श्री. देवी अहल्याबाई निवर्तल्याने होळकरांचा पक्ष निर्बल झाला. वृद्धावस्थेमुळें तुकोजी होळकरात दौलतीचा बोज राख-

ण्याचे सामर्थ्य उरले नव्हते. खर्ड्यांच्या स्वारीनंतर पुणे शहरांत तो अंथरुणास खिळला होता. आश्विन शुद्धांत कोजागिरी पौर्णिमेच्या सुमारास सवाई माधवराव पेशवा हितशत्रूंच्या कारस्थानाला बळी पडल्याने अखिल महाराष्ट्रावर प्रेतकळेची छाया पसरली. येथपासून मध्यान्हीवर तळपणारा नाना फडणीसाचा प्रतापसूर्य अस्ताचलाकडे वेगानें खालीं उतरूं लागला. यावेळीं उत्तर-हिंदुस्थानांत मराठे आणि शीख असे दोनच बलाढ्य प्रतिस्पर्धी उरलेले, इंग्रजी मुत्सद्यांच्या डोळ्यापुढें दिसत होते.

सवाई माधवरावाच्या मृत्यूनें पुणें राजधानींत अराजकता माजली. नानाचे नष्टचर्य ओढवले होते; साताऱ्याजवळ मेणवलीस आपल्या गांवीं तो जाऊन राहिला, तरीं राजकारण लढविण्याचे त्याचे खेळ सुरू होते. पण पाठीशी मनगटाचे बळ नसल्यानें त्याच्या धोरणामध्यें चंचलता उत्पन्न झाली. महादजीच्या मृत्यूनंतर शिंद्यांच्या दरबारांत जोपावेतों सत्तेची सूत्रें जुन्या मुत्सद्दी मंडळाच्या हातांत होती, तोपावेतों दौलतीची व्यवस्था सुरळीतपणें चालू होती. जिवबादादा बक्षी पुढें लवकरच मरण पावले. त्यांच्या मागें बाळोबातात्या काम पाहूं लागले.

यशोदाबाईच्या मांडीवर दिलेल्या चिमाजीच्या नांवानें परशुराम-भाऊ पटवर्धनानें साताऱ्याहून पेशवाईची *वस्त्रे आणली. पण ही व्यवस्था फार वेळ टिकली नाहीं. रावबाजीच्या हितचिंतकांनी शिंद्यांचें मन वळविलें, आणि त्याच्या सहाय्यानें खि. शक १७९६ डिसेंबर दिनांक ४ ला बाजीराव पेशवा झाला.

---

* परशुराम भाऊ पटवर्धनानें चिमाजीकरितां साताऱ्याहून पेशवाईचीं वस्त्रें आणलीं. त्याचप्रमाणें यशवंतरावानें अमृतरावाच्या मुलाकरितां (विनायकराव) पेशवाईचीं वस्त्रें आणलीं. (काव्येतिहास संग्रह. पत्र नं. ४५० पान ४४५).

I तुकोजी होळकर (१७९५–१७९७)

१ काशीराव
मृ. १८०८

२ मल्हारराव
१७९७ गर्दीत ठार झाला

३ विठूजी
१८०१ हत्तीच्या पायीं दिलें.

हरिराव होळकर
१८३३–१८४४

४ यशवंतराव=केसरबाई
मृ. १८११ मृ.१८४९

II मल्हारराव
१८११–१८३३

तुकोजी होळकर पुणें राजधानीत खि. शक १७९७ च्या आगष्टात निवर्तला; त्याच्या मुलामध्यें कलागती लागल्या. तुकोजीच्या मृत्यूनंतर दुसऱ्याच महिन्यांत धरण्याच्या गडबडीत सवाई मल्हारराव शिंद्याकडून मारला गेला. येथपासून यशवंतराव होळकराचें नांव प्रामुख्यानें झळकू लागले. स्वजनांनीं नाडलेला यशवंतराव हितशत्रूंच्या गराड्यांत फसला होता. थोड्याच महिन्याच्या अवधीत कोंडी फोडून यशवंतरावानें होळकरशाहीची राजसत्ता हस्तगत केली. यशवंतरावाच्या प्रभावापुढें गयाळी काशीरावाचे तेज फिकें पडले. इकडे दौलतरावाचें अमर्याद वर्तन महादजी शिंद्याच्या *विधवा बायांना असह्य झाले. माळवा प्रांताकडे त्या निसटल्या; त्यांची यशवंतरावाशी भेट होऊन

---

* महादजी शिंद्याच्या बायांना बऱ्हाणपुरांत ठेवण्यापेक्षां अहमदनगरच्या किल्ल्यांत अडकविण्यासाठीं सर्जेरावानें त्यांना चालविलें होतें. तेव्हां मुझफरखानाच्या सहाय्यानें बाया अमृतराव पेशव्याच्या आश्रयाखालीं जाऊन दडल्या. पुढें बाया माळवा प्रांताकडे निसटल्या.
(History of the Native States "Gwalior" by Surendra Nath Roy published in 1888).

बोलणी झाली. महादजी बाबाच्या वेळचे जुने कारभारी, बाया आणि यशवंतराव होळकर यांचा संघ साधला असता, तर दौलतराव शिंद्याच्या चाळयांना आळा पडणें शक्य झाले असते; पण ही तडजोड फिस्कटली. अशा उद्भवलेल्या परिस्थितीनें दौलतराव शिंदा गडबडला. आतां शिंद्याची सैनिक पथकें विंध्याद्रीचे घाट चढून माळव्यात शिरताच होळकराशी लहानमोठ्या चकमकींना प्रारंभ झाला. शिंदे-होळकरात धुमसणारा ग्रह-कलहाग्नि पुन्हा प्रज्वलीत झाला. जयापजयाचे पारडे हेलकावे खात होते. सरते शेवटी यशवंतरावानें मुळावरच घाव घातला. शिंदे होळकरांचे भांडण मिटविण्याचे सामर्थ्य पेशव्यात नव्हते. विठूजी होळकराच्या वधास कारणीभूत झालेल्या अपराध्यांनी यशवंतरावाची धास्ती खाल्ली होती. तडजोडीची बोलणी फिस्कटताच खि. शक १८०२ आक्टोंबर दिनांक २५ (नर्कचतुर्दशी शनिवार) वानवडीच्या रणमैदानांत हे सोबती सरदार शिंदे—होळकर मोठ्या निकराने रणरंगात रंगून गेले होते. यशवंतराव होळकराला विजयश्रीने माळ घातली; पण या यादवी युद्धानें उभयतांना कमकुवत केले. आपल्या धन्याला बंदिस्त करण्याची कल्पना देखील स्वामीनिष्ठ यशवंतरावाच्या मनाला शिवली नसेल; राजासारखे मोहरे उधळायला लावून यशवंतरावानें घोडचूक केली; आणि हीच चूक मराठी साम्राज्यशाहीला भोंवली; कारण रावबाजी पुण्य नगरीतून जो निसटला तो अनायासानें आश्रयासाठीं म्हणून इंग्रजी मुत्सद्यांनी पसरलेल्या जाळ्यांत जाऊन अचूक फसला. सत्ताधारी निसटल्यानें रिकामी राजधानी होळकराच्या हातात आली. पेशवाईचा कारभार आटोपता न आल्यानें यशवंतराव पेचात सापडला होता. इंग्रजी मुत्सद्यांच्या लाघवी भूलथापांना दुधखुळा यशवंतराव बळी पडला. अहि-नकुलाप्रमाणे शत्रत्वानें वागणाऱ्या या सोबती सर-

दारांची एकजूट साधणें फोल झाले. होळकरापेक्षा शिंद्याची लष्करी शक्ति बलाढ्य होती आणि याच कारणामुळें इंग्रज मुत्सद्यांची वक्रदृष्टी पहिल्यानें शिंद्याकडे वळली होती. इंग्रज आपल्या हितशत्रूच्या जागी आहे ही खरी भूमिका लक्ष्यांत न घेतां, यशवंतरावाने आपलें हितगुज या त्रयस्थासमोर ओकले. यशवंतरावाच्या स्वामीनिष्ठेचा फायदा कपटनिपुण क्लोजने उपटला. "आपण आपल्या सर्व सैन्यासह पुणें सोडून जाणेच श्रेयस्कर ठरेल. आणि येवढीशी गोष्ट आपल्या हातून घडत नाहीं याबद्दल...खेद वाटतो. आपण पेशव्याशीं स्वामीनिष्ठ आहात असे वारंवार लिहीता. तर पेशव्याने काय समजावे ?" या *पत्राच्या प्रभावाने यशवंतरावानें राजधानीची पकड सोडली आणि बाजूला झाला. बाजीराव खि. शक १८०३ मे दिनांक १३ ला पुण्यास पुन्हा स्थानापन्न झाला. इकडे होळकर तापी उतरून परत महेश्वराकडे फिरताच युद्ध पुकारून, वेल्सलेनें आगष्ट दिनांक ११ ला अहमदनगरचा किल्ला घेतला. शिंदे आणि भोसले यांच्या जोड सैन्याला इंग्रजांनी अवघ्या पांचच महिन्यांत धूळ चारली. खि. शक १८०३ डिसेंबर महिन्याच्या शेवटी पेशव्याप्रमाणेच शिंदे-भोसल्यांच्या मानेभोंवती इंग्रजांनी आपल्या तैनाती फौजेची तात आवळली.

खि. शक १८०४ चा जानेवारी महिना उजाडला. शिंदेभोसले इंग्रजाशी लढत असता यशवंतराव आडला आणि स्वस्थ बसला. आपल्या हितचिंतकांना आळविण्याकरिता आता त्यानें त्यांच्याशी †पत्र-


---

* खि. शक १८०३ मार्च दिनांक १६ चे क्लोजचें यशवंतरावास लिहिलेले पत्र पहा.

† परशरामपंत प्रतिनिधीस यशवंतरावाचें पत्र "मराठ्यांच्या लढाया" पान २४५.

व्यवहार सुरूं केला. यावेळीं यशवंतरावाला चोहोंकडून आकाश फाटल्या-सारखे झाले असेल. पेशवा, शिंदा आणि भोसला यांना मराठी साम्राज्य संघातून फोडण्यांत यश लाभल्यानें इंग्रजांना अहंकारानें ग्रासले होते. विजयमदानें धुंद झालेला इंग्रज आतां यशवंतरावाला कस्पटासमान लेखू लागला. होळकराविरूद्ध इंग्रजी पलटणींच्या हाल-चाली चालू झाल्या. नुकत्याच घडलेल्या शिंद्याच्या पराजयाची चित्रे यशवंतरावाच्या डोळ्यासमोर होती. सैन्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या फितुरीनें श्रेष्ठ गणला गेलेला शिंद्याच्या सैनिक सामर्थ्याचा पोलादी किल्ला विदीर्ण झाला; हे दृश्य यशवंतरावाला दिसले होते. आपल्या सैन्यातल्या फितुरी टोपीवाल्यांची कारस्थाने त्यानें उघडपणें चव्हाट्या-वर मांडली. टॉड, रायन् आणि व्हायकर्स या तीघांना उदेपूराजवळील नहार-मगऱ्यावर यशवंतरावाच्या आज्ञेनें फांशी दिले. या अपराध्यांची मुंडकी त्यांच्या फितुरी पत्रासह गांवाच्या वेशीवर टांगून ठेविली होती. या कडक शिक्षेनें इतर फितुऱ्यांना जरब बसली. आपली मंडळी आणि अवजड सामान जोधपुरच्या राज्यात सुरक्षित जागीं ठेवून युद्धासाठीं यशवंतराव सडा झाला. अमीरखानाला मोठ्या घोडदळासह यशवंत-रावानें बुंदेलखंडात पाठविले; गनीमी काव्याने लढून त्यानें तिकडे धुमाकूळ उडविला.

इंग्रजाचा होळकराविरूद्ध चौफेर हल्ला चालू झाला. वेलसलेच्या सैन्यानें दक्षिणेचा मार्ग अडवून धरला होता. दोहदच्या वाटेने गुज-राथेतून पश्चिम दिशेने कर्नल मरे चाल करून आला. तहान्वये सहाय्य करण्यास इंग्रजांनी शिंद्याला वचनबद्ध करून ठेविले होते. त्याप्रमाणें जॉन बॅप्टिस्ट फिलोज आणि बापूजी शिंदे भेलसा, सिहोर, अष्टे या मार्गांने, पूर्वबाजूने, होळकरांची ठाणी हस्तगत करीत चालले होते.



खि. शक १८०४ एप्रिल दिनांक १७ ला जयपुर जवळील देवसर येथून उत्तर दिशेकडोन सेनापति लेकने होळकराविरूद्ध चाल करून जाण्यास दोन मोठे सैन्य-विभाग पाठविले. कर्नल डॉनच्या पथकानें बनास नदीकांठचा टोक–रामपुरा खि. शक. १५–५–१८०४ ला हस्तगत केल्यावर हाडोतीजवळ इंग्रजी पलटणें लगट करून अंगावर चालून आली; यशयंतराव दाक्षिणेकडे उज्जनपावेतों वेगानें खाली उतरला. यावेळीं कर्नल मरे महीनदी उतरून वडनगरपावेतों पोहोंचला होता. यशवंत-रावाच्या हालचालीने कर्नल मरेची घाबरगुंडी उडाली. परत मही-नदीपार होऊन तो एका सुरक्षित जागी जाऊन दडला. अशा प्रकारे बंदुकीची एक गोळी देखील न डागतां यशवंतरावानें कर्नल मरेला चेपून टाकला. या योगानें होळकराची पश्चिम आघाडी निर्घोर झाली. यशवंतरावाच्या हालचालीनें मान्सनला सर्वस्वी चकविले. पावसाळा तोंडाशी आल्यानें कोट्यास तळ ठेवण्याविषयीं सेनापती लेकनें मान्स-नला निश्चित आज्ञा दिली होती. आपल्या सैन्याच्या पराक्रमाला भिऊन पळपुट्याप्रमाणें होळकर पळत आहे असे मान्सनला भासले. मुकुंद-

दऱ्यात येऊन जूनच्या दिनांक २० ला तो *सोंदवाड्यातील होळकरांचा प्रदेश व्यापीत पुढें पुढें घुसत चालला. हिंगळाजगडचा महत्वाचा किल्ला सिंक्लेअरने खि. शक १८०४ जुलै दिनांक २ ला हस्तगत केला. या विजयानें मान्सनचा आत्मविश्वास वाढणें असंभवनीय नव्हते. मान्सनचे सैन्य गरोटजवळ आल्याची बातमी यशवंतरावाला समजली त्यावेळीं त्यांच्यामध्ये सोळासतरा कोसापेक्षां जास्त अंतर नव्हते. या दोन प्रतिस्पर्धी सैन्यांच्या मध्यंतरी चंबल नदीचा अथाग प्रवाह दक्षिणेकडून उत्तरेकडे वाहत होता. रामपुऱ्याजवळ खडावदा गावीं चंबल नदीच्या उतारघाटाने उतरून खि. शक १८०४ जुलै दिनांक ८ ला मध्यरात्री होळकरानें इंग्रजी सैन्यावर छापा घातला. बापूजी शिंदे आणि ल्यूकन यांना आघाडीवर शत्रूच्या तोंडावर उभेकरून मान्सन पिच्छेहाट करून मुकुंद-दऱ्याकडे मागे परतला.

" कालक्रमानुसार होळकर-इंग्रज युद्धाचे †टांचण. "

मान्सनची पिच्छेहाट गरोट ते आग्रा सुमारे १०० कोस अंतर जाण्यास जुलै दिनांक ८ ते ३१ आगष्ट पावेतो.

---

* छोटी आणि मोठी काली सिंध या दोन नद्यांच्या खोऱ्यांतील प्रदेशाला सोंदवाडा म्हणतात. जनावरांच्या चोऱ्या करण्यांत सोंदे लोक प्रवीण आहेत. मॉन्सनच्या सैन्यांतील घोडे पळवून याच चोरट्यांनीं त्याला सळो का पळो करून सोडले होते. छोटी काळीसिंध देवासजवळ उगम पावून चौमहाल स्टेशनच्या पुढें चंबल नदीला मिळते. मोठी कालीसिंध बागळीजवळ विंध्याद्रींत उगम पावून कोट्याच्या ईशान्येला पिपरडीजवळ जाऊन चंबळ नदीला मिळते.

† मराठी इतिहासाच्या अरसिकांना देखील गोडी लावून मोहून टाकील असें पुस्तक म्हणजे कै. गु. शिवरामपंत परांजपे यांचे " मराठ्यांच्या लढाया " होय. यांतील बरीच टांचणें त्यांतून घेतली आहेत.

क. डॉन यानें टोंक-रामपुरा घेतला १५–५–१८०४

जूनमध्ये कोटा सोडून मान्सन दऱ्यात पोहचला २८–६–१८०४

सिंक्लेअरने हिंगळाजगड घेतला. २–७–१८०४

गुरीगांवची लढाई ८–७–१८०४

मान्सन कोट्यास चंबल उतरला १२–७–१८०४

बंदिस्त केलेला जखमी ल्यूकन कोट्यास मरण पावला; बापूजी शिंद्याचें सैन्य होळकरास मिळाले.

चांबळा नदी घाटची लढाई. १५–७–१८०४

मान्सन टोंक-रामपुऱ्यास पोहचला. २७–७–१८०४

सैन्य आणि अन्नसामुग्री लेकने पाठविली; १४–८–१८०४
कच खाल्लेल्या मान्सनला तोंड देण्याचे धैर्य उरले नव्हते;
त्याने टोंक-रामपुरा सोडला. २१–८–१८०४

बनास नदी कांठची लढाई. २२–८–१८०४

मान्सन खुशालगडास पोहोचला. २४–८–१८०४

खुशालगड जयपूरकरांचे ठाणें होतें; शिंद्याचा सरदार सदाशिव-भाऊ बक्षी मॉन्सन विरुद्ध उलटला; जयपूरकरांनी टाळा दिला.

खुशालगडाहून मान्सन हिंडोन येथें पोहोचला. २७–८–१८०४

मान्सनचा फत्तेपूर-शिक्री येथें तळ. २८–८–१८०४

मान्सन आग्रा येथें पोहोचला. ३१–८–१८०४

उजाड पडलेले इंदूर कर्नल मरेने घेतले. ३–९–१८०४

यशवंतरावाने सप्टेंबर महिन्यात मथुरा घेतले; Peshwa's Commander काकाजीचे (रघुनाथ महिपत फणसे) Major Walker यांस इंदूरहून पत्र.

सिकंदऱ्याहून लेक मोठ्या सैन्यासह निघाला. १–१०–१८०४

दौलतराव शिंद्याचे इंग्रजास पत्र १८–१०–१८०४

बापूजी शिंदे आणि सदाशिवभाऊ बक्षी यांच्या फितुरीची कारणें व समर्थन.

[आक्टोबर महिन्यातील हालचाली]

यशवंतरावानें दिल्लीवर हल्ला केला; काश्मीर दरवाजात नऊ दिवस निर्वाणीचें युद्ध; बरिया येथील शेरसिंग इंग्रजांच्या सहाय्यास आला; दिल्लीत कर्नल आक्टरलोनीचा यशस्वी प्रतिकार. पानिपत-जवळ यमुना नदी उतरून यशवंतराव अंतर्वेदीत शिरला. महंमुदाबाद, सालढाणा-बेगम समरूची राजधानी; पुढें शामलीच्या गढीत क. बर्नच्या पलटणींना यशवंतरावानें कोंडले होते; कैथलचा भैयालालसिंग आणि झिंदचा भागसिंह यांनीं सहाय्य करून बर्नला सोडविले. पुढें यशवंत-राव हंसगजावरून सोरम येथें गेला.

दिल्लीहून लेक होळकराच्या पाठलागास अंतर्वेदींत गेला; आणि फ्रेझर तेथूनच दडून बसलेल्या होळकरांच्या पलटणी व तोफखान्याच्या मागावर निघाला. ५–११–१८०४

फ्रेझर दीग येथें पोहोचला आणि त्यानें हल्ला चढविला. १३–११–१८०४

कोरिया, अल्लीगंज मार्गानें यशवंतराव फरूख्खाबादेस आला. १५–११–१८०४

यशवंतराव रात्रौ नाचरंगात बसला असतांना दीग येथील वेढ्याची बातमी त्याला समजली. १६–११–१८०४

सैन्यासह लेक फरूख्खाबादला आला १७–११–१८०४

लेकच्या सैन्याला टाळून आणि मैनपुरीजवळ कालिंदी-यमुना नदी उतरून यशवंतराव दीगजवळ पोहोचला. क. फ्रेझर तोफेच्या गोळ्यानें जखमी झाला; आणि मथुरेस जाऊन मरण पावला. २४–११–१८०४

फ्रेझरच्या पश्चात् क. हॅमंड आणि क. मान्सन यांनीं इंग्रजांचा हल्ला चालू ठेविला.

क. मान्सनला लेकचे सैन्य दीग येथें मिळालें. २८–११–१८०४

दीग किल्ल्यावर निकराचें हल्ले चालू झाले १३–१२–१८०४

शहाबुरूजाला खिंडार पडताच मध्यरात्री हल्ला २३–१२–१८०४

दीग किल्ल्यावर इंग्रजी बावटा रोवला गेला २४–१२–१८०४

लेकनें आपला मोर्चा भरतपुरावर रोखला २८–१२–१८०४

लेक भरतपुर किल्ल्यासमोर आला २–१–१८०५

तटाला खिंडार पाडून इंग्रजांचा पहिला हल्ला; इंग्रजांना माघार घ्यावी लागली ९–१–१८०५

दुसरा निकराचा हल्ला आणि मोड २१–१–१८०५

भरतपूर किल्ल्याच्या तटावर देखरेख करीत असतां रणजीतसिंगाचा काका तोफेच्या गोळ्यांनें ठार झाला व मोठ्या मुलाचा हात तुटला

शत्रूचे लक्ष्य दुभंगविण्यास मोठ्या घोडदळासह अमीरखान अन्तर्वेदींत शिरला; त्याच्या पारिपत्यासाठीं क. स्मिथ मोठ्या सैन्यासह भरतपूराहून निघाला ८–२–१८०५

भरतपुरावर तिसरा हल्ला आणि मोड २०–२–१८०५

शेवटला निकराचा चवथा हल्ला व मोड २१–२–१८०५

पांचव्या हल्ल्याचे भय घालून भरतपुरापासून थोड्या अंतरावर ईशान्येस जाऊन लेकनें तळ दिला. २७–२–१८०५

भरतपूरच्या रणजीतसिंग जाटाशीं इंग्रजांचा तह ९–४–१८०५

खि. शक १८०५ मार्च ते आगष्टपर्यंत होळकराच्या हालचालीचा खर्डा खरडण्यास पत्रव्यवहाराच्या साधन-सामुग्रीचा कमीपणा भासतो. भरतपूरची मोहीम फेब्रुआरी महिन्याच्या शेवटीं लेकने कशीबशी

आटोपती घेतली. अजिंक्य गणलेल्या इंग्रजांच्या यशाला या अपयशानें काळीमा फासली. यशवंतराव होळकराचा यशोदुंदुभी अखिल हिंदुस्थानात दुमदुमला. बंगाल आणि बिहार उध्वस्त करून इंग्रजांच्या काळजावर—कलकत्ता राजधानीवर—घाव घालण्याचा विचार यशवंतरावानें योजिला होता. या अघटित कल्पनेनें सैन्यातला अधिकारी वर्ग विस्मयचकित झाला होता. वाऱ्यावर अथवा वाळूच्या आधारावर उभारलेले मनोरे सत्यसृष्टींत खोटे ठरतात. यशवंतरावाला भ्रम झाल्याविषयीं कोणी कुजबुजू लागले होते. युद्धास कंटाळलेले सैन्याधिकारी या स्वारीविषयीं साशंक असल्यानें त्यांची सहानुभूति लाभली नाहीं. म्हणून ही धाडसी योजना यशवंतरावाला सोडून देणें भाग पडलें. याच प्रसंगीं भरतपुरच्या रणजीतसिंग जाटाला होळकरापासून फोडण्यात इंग्रजी कारस्थानाला यश आलें. खिस्ती शक १८०५ एप्रिल दिनांक ९ ला रणजीतसिंग जाटानें इंग्रजाशीं तह केला. इंग्रजांच्या सामर्थ्यांची राजपूत संस्थानिकांवर छाप बसली होती; त्यांच्यापैकीं एक देखील राजपूत संस्थानीक यशवंतरावाच्या पक्षातर्फे प्रत्यक्ष युद्धांत सहाय्य करण्यास आतां उरला नव्हता. याच्या उलट यशवंतरावाच्या यशस्वी प्रतिकारानें त्याच्याविरुद्ध इंग्रजांना उघड सहाय्य करण्यास राजपूत संस्थानीक कचरत होते. तथापि अपयशानें बुजून स्वस्थ बसलेल्या मराठी सरदारांचे डोळे यशवंतरावाच्या यशस्वी हालचालीकडे केंद्रित झाले होते. इंग्रजी वकीलाच्या धमकावण्यांना भीक न घालतां दौलतराव शिंदा दक्षिणेंतून उत्तरेंत आला होता. मागील आठ महिन्यांतील यशवंतरावाच्या यशस्वी झुंजीनें सोबती सरदारांची तडजोड साधण्यास अनुकुलतेचें वातावरण निर्माण झाले होते. होळकरांचा वकील खंडो महादेव मोठा मुत्सद्दी होता. शिंदे—होळकरांची तडजोड साधण्यास कार्यांचें महत्व ओळखून सर्जेराव घाटगे पुढें

झाला. सबळगडांत झालेल्या या शिंदे–होळकरांच्या भेटीसंबंधीं प्रसिद्ध झालेल्या "संधी गमावली" या रियासतकारांच्या निबंधांत कालनिर्णय ठरविण्यास कागदपत्रांचा आधार आढळत नाहीं. मुनशी कवलनयनच्या पत्राशिवाय त्यांनीं इतर उल्लेख केला नाहीं. मुनशी कवलनयनसारख्या घरभेद्यांचा त्याप्रसंगीं सुळसुळाट झालेला होता. अशा अवस्थेंत सोबती सरदारांची समक्ष भेट मध्यस्थांनीं सबळगडांत ठरविली होती. यशवंतराव होळकराचे डोळे दिपविण्यास आपल्या दरबारी वैभवाचे प्रदर्शन मांडून भेटीसाठीं दौलतराव शिंदा मोठ्या शामियान्यांत बसला होता. अंतर्यामी बळावलेल्या परस्पराविषयींच्या अविश्वासानें हे सोबती सरदार एकमेकाकडे मत्सर भावानें पहात असत. भेटीची वेळ होताच यशवंतराव आपल्या शेकडों सशस्त्र सरदारासह घोड्यावरून खाली उतरला. पांढरे पोशाख करून आणि खांद्यावर भाला घेऊन आलेल्या होळकराच्या सैन्यानें शामियान्याला गराडा घातला; उभयतांच्या तोफखान्यानें सलामी दिली. तोफांच्या गडगडाटानें कानठाळ्या बसल्या; सरदारांच्या एकसारख्या पोशाखानें यशवंतरावाला ओळखून काढणें कठीण झालें. या बाह्य देखाव्यानें हा भेटीचा बार फुसका ठरला. सबळगडानंतर मियानपुरापावेतों शिंद्याच्या सैनिक तळाच्या आसपास यशवंतराव फिरत होता. "दौलतराव आपणांपेक्षां होळकराशीं ज्यास्त वचकून वागतो ही गोष्ट उघड दिसते. यासाठीं शिंद्यावर वजन टाकण्यास एकादे मोठें इंग्रजी सैन्य जवळ आल्याशिवाय काम भागणार नाहीं." इंग्रजी वकीलाची *विचारसरणी अगदी बरोबर होती. पण शिंदे–होळकरांचा समेट

* शिंद्याच्या छावणींतून ख्रि. शक १८०५ आगष्ट दिनांक १० ला जेंकिन्सनें मालकमला पाठविलेले पत्र पहा.

साधण्यास दुसरी विघ्नें उपस्थीत झालीं. *अंबूजी इंगळ्याजवळून उकळलेल्या रकमेचा मोठा हिस्सा यशवंतरावानें घेतला होता; या संशयानें उभयतामध्यें मत्सराग्नीनें ज्यास्तच पेट घेतला.

पावसाळा संपतांच इंग्रजी पलटणी होळकराच्या सैन्याला वेढा घालण्यास रेवाडीजवळ जमूं लागल्या. इंग्रजांचा ससेमिरा मिटविण्याचा प्रश्न यशवंतरावापुढें दत्त म्हणून उभा होता. उदेपुरचा राणा यशवंतरावाला अनुकूल होता; पण शिंद्यांच्या नकारामुळें एकट्या यशवंतरावाला उघडपणें सहाय्य करण्यास तो धजला नाहीं. अशा संकट समयीं शीख सत्तेचें सहाय्य मिळविण्याची मोठी मसलत यशवंतरावाच्या मनांत उद्भवली. पण हें कार्य सोपें नव्हतें. उदेपुरापासून अमृतसर तीनशें कोस अंतरावर वसलेलें होते. इतकें मोठें अंतर तोडीत असतांना शत्रूच्या हल्ल्याची क्षणोक्षणीं भीति वाटत होती. अनेक अडथळे बाजूस सारून पांच महिन्याच्या आंत आपल्या सर्व सैन्यासह यशवंतराव पंजाबांत गेला. त्याच्या हालचालीचा आराखडा खालीं दिला आहे.

मियानपूर ते अमृतसर

यशवंतराव होळकराच्या हालचालीचा आराखडा.

खि. शक १८०५ आगष्ट ते १८०६ जानेवारी दिनांक ६

यशवंतरावाचे घोडदळ मियानपुराहून अजमेरास आले.


२०–८–१८०५

आपल्या कुटुंबाची मंडळी व अवजड सामान यशवंतरावानें जोधपूर राज्यांत गुप्तस्थळी ठेवले.

---

* अंबुजी इंगळे याजपासून उकळलेल्या रकमेचा मोठा हिस्सा होळकरानें घेतलेल्या किलाफाचे (वांकडें, वैमनस्य) बीजारोपण पुन्हा झाले. (अ. ना. भागवत. होळकरांची कैफियत पान १०७ पहा.)

यशवंतरावाने अजमेर सोडले १४-९-१८०५



यशवंतराव कोंडाला येथें येतांच नारनोळ येथून दिल्लीच्या रोखानें आर्मस्ट्रांग गोवळगडापावेतों मागे सरकला. २३-९-१८०५

चर्खी-दाद्री येथून यशवंतराव पुढें चालला. २-१०-१८०५

चर्खी-दाद्री प्रांत हरियाणा दिल्लीच्या पश्चिमेस आहे. पुणें दरबारांतील होळकराच्या वकीलाला येथून पाठविलेले *पत्र प्रसिद्ध झालें

*ख्रि. शक १८०५ आक्टोबर दिनांक १ ला चर्खी-दाद्रीहून पाठवीलेले पत्र. [अ. ना. भागवत पत्रव्यवहार पूर्वार्ध खंड१ पत्र नं. ८५ पान १३९]

आहे. “ खंडो महादेव यांची रवानगी इकडोन केली. भेट झाल्यावर मशारनिल्हे सविस्तर मजकूर समजावतील. भारमल होळकर याजकडे दिनचर्येचें वर्तमान पेशगी अन्वये लिहून पाठविणें म्हणजे स्वारीत पोहोचेल. येथून पुढें पतियाळाकडे जावयाचा इरादा; तेथें गेल्यावर मसलतीचे अन्वये कर्तव्य तें केलें जाईल. ” आपल्या राज्यापासून यशवंतराव इतक्या दूर अंतरावर होता तरी घरची बातमी त्याला अचुक समजत असे. भारमल दादा होळकर कुंवर—लेकवळा—होता. होळकराच्या माळव्यातील प्रदेशाचे रक्षण करण्याचे काम भारमल दादाकडे होते; तें त्यानें चोख बजावले. या म्हणण्याला चर्खी-दाद्रीहून पाठविलेल्या पत्रानें दुजोरा येतो. मुख्य सैन्याशी संबंध ठेवून त्यानें साखळीला विजोड होऊं दिले नाहीं.

होळकराचे वकील झिंदच्या भागसिंहाकडे गेले.	६–१०–१८०५
इंग्रजाच्या सहाय्यासाठीं साहेबसिंगाचें लेकला पत्र.	१५–१०–१८०५
मेजर जनरल जोन्सचा तळ झिपूरास Zypoor होता.	१८–१०–१८०५
रेवाडीस कर्नल बॉल बसला होता.	२२–१०–१८०५
पतियाळाच्या आसाकुंवर राणीला अमीरखान भेटला.	२७–१०–१८०५
होळकरांचा तोफखाना व पलटणी हांसीस पोहचल्या.	३०–१०–१८०५
साहेबसिंगानें यशवंतरावाला राज्याबाहेर जावयास सांगितलें.	१–११–१८०५
ठाणेश्वर व इस्मेलाबाद यांच्यामधून पुंद्रीच्या जवळच्या मार्गानें इंग्रजी पलटणींना कैथलच्या भाईलालसिंगानें पतियाळास नेले.	५–११–१८०५
यशवंतरावानें पतियाळा सोडला.	६–११–१८०५
पृथुतीर्थाजवळ Pehowa इंग्रजी पलटणींचा तळ.	८–११–१८०५
शेखावाटींत ठेविलेला तोफखाना आणि पलटणी शत्रूचे हल्ले चुकवित यशवंतरावास पतियाळाच्या पुढें मिळाल्या.	८–११–१८०५

यशवंतराव मालेरकोटल्यास पोहोंचला. ११-११-१८०५
यशवंतराव रायकोट येथें गेला. १३-११-१८०५
सतलज नदीपासून सात कोसाच्या अंतरावर गुजरवाल
(Goojarwal) येथें होळकराचा तळ. १५-११-१८०५
इंग्रजी पलटणी पतियाळा येथें आल्या. १७-११-१८०५
होळकरानें Buseah बसिहा लुटलें. २०-११-१८०५
होळकर फिल्लोरजवळ सतलज नदी उतरला. २३-११-१८०५
भाऊ भास्कर [चिटणीस] अमृतसरला पोहोंचला. ३-१२-१८०५
लेक सतलज नदी उतरला. ६-१२-१८०५
श्री गोविंदपूर घाटाजवळ व्यास-गंगा उतरून
यशवंतराव अमृतसरच्या रोखानें निघाला. ७-१२-१८०५
अमृतसर येथें होळकर रणजितसिंहाला भेटला. १०-१२-१८०५
होळकराचे वकील हबीबउल्ला व बाळाराम शेट आगरवाला
तहासाठीं इंग्रजी तळावर आले. १७-१२-१८०५
शीख दरबारचा वकील भागसिंग आणि फत्तेसिंग
अहुलियावाला लेकला भेटतात. १९-१२-१८०५
होळकराच्या वकीलांना इंग्रजी तळावर तंबू ठोकून
राहण्याची मोकळीक मिळाली. २१-१२-१८०५
अमृतसराहून तीन कोसाच्या अंतरावर मुखताल
येथें यशवंतराव गेला. २२-१२-१८०५
अमीरखानाचें भांडण; खानाचें लेकला पत्र. २५-१२-१८०५
व्यास-घाट येथें तहनाम्यावर स्वाक्षऱ्या झाल्या. ६-१-१८०६

व्यास–घाटाच्या तहाप्रमाणें इंग्रजी पलटणी दिल्लीकडे गेल्या; आणि त्यांच्यामागून होळकराचें सैन्य माळवा-प्रांताकडे परत फिरलें.

यशवंतराव येथून *ज्वालामुखीचे दर्शनाला गेला. याच सुमारास १०-२-१८०६ चे यशवंतरावाने लिहिलेलें पत्र† फारच महत्वाचे आहे; तें पुढें दिले आहे. " आपले पत्र पाऊन लेखनार्थ अवगत झाला; चिरंजीव भिमाबाईचे पत्रावरूनही सर्व समजले. त्याचे उत्तर व इकडील वर्तमान सविस्तर भिमाबाईचे पत्रीं लिहिला आहे, त्यावरून कळेल. राजयाजीस पहिला खलिता प्रविष्ठ करून उत्तर घेऊन पाठविले आहे. हल्लीचाही खलिता पावता केला; उत्तर मागाहून पाठवितो. संस्थानिकांचें लक्ष्य इकडे लागले आहे. सोबत्याकडील मामल्याचा जाबसाल अद्याप उरकला नाही. फिरंग्याचे अंत:करण शुद्ध नाही; तत्रापि आपले ठिकाणीं हुशार राहून बातम्या चहुकडील ठेवून सावधानतेने आहेत म्हणोन लिहिले ऐसीयासी—पेशजीच्या खलित्याचे उत्तर पाठविले तें पावलें. दुसरेही उत्तर घेऊन पाठविणें. राजयाजीचे लक्ष्य इकडे आहे हे त्यांचे थोरपणास योग्यच आहे. ताम्रासी सला जाला; याचा विस्तार अगोदर लिहिला आहे; आणि हल्लीही लिहिला आहे. तहाचे समयी संस्थानिकांविशी इंग्रजासी पक्केपणें बोलून घेतले आहे. आतां कांहीं काळजी न करावी; म्हणोन तुम्ही राजयाजीची खात्री करणें. सोबत्याकडील मामल्याचा जाबसाल जसा ठरेल तसा लिहून पाठविणें. ताम्र दिल्लीकडे

---

* ज्वालामुखी देवीचें वर्णन " कल्याण " हिंदी मासिकाच्या " शक्ति-अंकात " प्रसिद्ध झाले आहे. ज्वालामुखीचे आगगाडीचे ठिकाण कोट-कांगड्याजवळ सतलज-बियास दोआबात आहे. एका उकळत्या पाण्याच्या कुंडांत पेटलेली ज्योत तेवत असते. पाण्याच्या लहरींमुळें ज्योत नाचलेली दिसते. हा चमत्कार पाहण्यास भाविक यात्रेकरूंची रीघ लागलेली असते.

† " बळवंतराव साबाजी " यांस पंजाबातून पाठविलेले पत्र.
[अ. ना. भागवत पत्रव्यवहार पूर्वार्ध खंड १ ला पत्र नं. ९६ पान १४९]

कूच करून गेले. स्वारीही तिकडे सत्वरच येत आहे." यशवंतराव होळकराचे हें पत्र सरदार बुळे यांच्या दफ्तरांत सांपडले. यशवंतरावाची कन्या भिमाबाई गोविंदराव बुळयाला दिली होती. बुळयांच्या घरांत वावरणारा हा "बळवंतराव साबाजी" पुण्यास बसून यशवंतरावाची बाजू बाजीरावाला समजविण्यासाठी प्रयत्न करणारापैकीं असण्याचा संभव आहे. या पत्रांत 'ताम्र, सोबती, संस्थानिक आणि राजयाजी' हे शब्द कोणाला उद्देशून वापरले आहेत याचा उलगडा लक्ष्यांत येताच, पत्राचा अर्थ बरोबर लागतो. 'ताम्र' म्हणजे इंग्रज होत; आणि 'सोबती' हें विशेषनाम शिंद्याला उद्देशून योजिले असल्याचे पत्रव्यवहारात अनेक जागी लिहिलेलें आढळतें. 'सोबती सरदार' हे मराठी साम्राज्यांतले शिंदे-होळकर होत. "संस्थानिक" शब्द पत्रांत दोन जागी एकाच अर्थी वापरला आहे. संस्थानिक शब्द कुणाला उद्देशून लिहिला असेल? खि. शक १८०६ या वर्षी पत्र लिहिले गेले तेव्हां शिंदे होळकरांची गणना संस्थानिकात नव्हती. शिंदे-होळकर मराठी साम्राज्याच्या दौलतीचे सरदार होते. खि. शक १८१८ त मंदोसरच्या तहानें मराठी साम्राज्याची सरदारी गमावून इंग्रजी छत्राखालचा होळकर स्वतंत्र व संरक्षित संस्थानिक झाला. राजपूत संस्थानीक मराठी साम्राज्याचे—टांका भरणारे—करभार देणारे संस्थानीक होते; आणि त्यांनाच उद्देशून तो शब्द वापरला असल्याचे पत्राच्या वाचनानंतर सहजी लक्षांत येईल. आतां फक्त 'राजयाजी' हा शब्द उरला आहे. राजयाजी शब्द पत्रांत तीन जागी वापरला आहे. व्यासघाट येथील तहाचे चर्चेत याच संस्थानीकाविषयीं इंग्रजाशी पक्केपणी बोलून घेतल्याची "राजयाजीची" खात्री पटविण्याविषयीं यशवंतराव बळवंतराव साबाजीला निश्चितपणें बजावित आहे. "सोबत्याकडील मामल्याचा जाबसाल जसा ठरेल तसा लिहून

पाठविणें. " " जसा ठरेल तसा " या शब्द समुच्चयाच्या योजनेनें सोबत्याच्या मामल्या—प्रकरणाविषयीं यशवंतरावाला विशेष काळजी वाटत नव्हती, हे स्पष्ट झालें आहे; पण, संस्थानीकाविषयीं " राजयाजीची " खात्री पटविण्याविषयीं यशवंतरावाला ज्यास्त कळकळ वाटत असल्याचें पत्रांत व्यक्त केले आहे; आतां राजयाजी म्हणून कोणास संबोधिले असेल ? या राजयाजीला यशवंतरावाचा खलिता प्रविष्ट होतो; आणि त्याचे उत्तर पावल्याची यशवंतराव मान्यता देतो; इतक्या आपलेपणानें यशवंतरावाच्या निकट परिचयाचा खलिते स्वीकारणारा हा राजयाजी कोण ? अर्थात हा राजयाजी सत्ताधारीच असला पाहिजे. ' राजयाजीचें लक्ष्य इकडे आहे हे त्यांचे थोरपणास योग्यच आहे ' या वाक्यांत यशवंतराव उपरोधिकपणें राजयाजीच्या ' थोरपणावर ' घसरला आहे. " राजश्री या विराजित " या शब्द समुच्चयाचा गूढार्थ म्हणजे " राजयाजी " आहे असे विचारान्ती उमगणें कठीण नाहीं. यावरून हा दुसरा-तिसरा कोणी नसून दुसऱ्या बाजीराव पेशव्यालाच उद्देशून ' राजयाजी ' हा शब्द पत्रांत योजिला आहे.

खि. शक १९३९ हें वर्ष म्हणजे रणजीतसिंहाचे शत—सांवत्सरिक होय. याच वर्षी " शिखांचा शह " प्रसिद्ध होणें, हाही पण योगायोगच होय. यशवंतराव होळकराच्या भेटीच्या वेळीं रणजीतसिंह ऐन तारुण्याच्या भरात म्हणजे पंचवीशीच्या घरांत होता. मराठे आणि शीख संघ साधला असतां तर त्याचे परिणाम फार दूरवर पोहोंचले असते. मराठे—शीख संघ साधण्याचा यशवंतरावाचा डाव साधण्याची संधी रणजीतसिंहानें गमाविली. पुढें लवकरच इंग्रजांच्या बाबतींत मुग्धता धारण केलेल्या याच रणजीतसिंहाला दक्षिण आणि पूर्व दिशेनें त्यांनीं त्याला पायबंदांनी जखडून टाकलें. शीखांचें एकछत्री साम्राज्य स्थापण्याचा त्याचा प्रयत्न निष्फळ ठरला.

होळकर घराण्याचीं सूत्रें खेळविण्याचें स्वातंत्र्य पूर्णपणें यशवंतरावाच्या हातांत होतें. सतलज नदीच्या उत्तरेकडील बहुतेक मिसलींचीं वतनें गट्ट केल्यानें रणजीतसिंहाचें राज्य बरेंच फुगलें होतें. आपल्या स्वजातीय शेजाऱ्यांचें वैयक्तिक स्वातंत्र्य अबाधित राखून परकीय आक्रमणाविरुद्ध त्यांचा एकमुखी संघ उभारण्याची कल्पना क्वचित प्रसंगीं सुचलेली आढळते; मग रणजीतसिंह तेवढाच अपवाद ठरावा ही गोष्ट कशी संभवते? परप्रांतस्थ मराठे–शिंद्याच्या धोरणाविषयीं सतलज व यमुना नद्यांच्या प्रदेशामधील Cis-Sutlaj-States संस्थानीक गडबडले होते; आतां स्वजातीय रणजीतसिंहाच्या नीतीनें तर हे संस्थानीक आपल्या अस्तित्वाविषयीं साशंक झाले यांत नवल नाहीं. दिल्ली हस्तगत होताच या दुबळ्या शीख संस्थानीकांवर इंग्रजांच्या मायावी राजकारणाचा प्रभाव पडणें अशक्य नव्हते. या संस्थानीकांना आपल्या सहाय्यार्थ गोवण्याचे इंग्रजी धोरण फलद्रूप होण्यास अडचण पडली नाहीं. अशाप्रकारें शीखांचे सहाय्य कर्नल आक्टरलोनीला लाभल्यानेंच दिल्ली जिंकून घेण्याचा यशवंतरावाचा प्रयत्न फसला. दिल्लीच्या काश्मीर दरवाज्यांत आठ नऊ दिवसपावेतों यशवंतरावानें रणधुमाळी माजविली होती. पण बादशहा शहाअलमनें उत्साह दर्शविला नाहीं. यशवंतराव अंतर्वेदींत शिरला; आणि शामलीच्या गढीत त्यानें कर्नल बर्नला कोंडले. तेव्हां देखील याच ठिकाणच्या शीखांनीं सहाय्य देऊन कर्नल बर्नला मुक्त केले. रणजीतसिंहाच्या भेटीस निघालेल्या यशवंतरावाला आतां त्याच शीख संस्थानांच्या सीमा प्रांतांत शिरून जाणें भाग होतें. मार्गांत एक देखील लढाई झाली नाहीं. हुतुतुच्या खेळाप्रमाणें प्रतिस्पर्धी एकमेकाविरुद्ध धाऊन जाण्यानें कसकशा हालचाली झाल्या असतील हें सोबत दिलेल्या कालक्रमाचें टिपण व नकाशा यावरून आढळेल. यशवंतरावाचा उद्देश रणजीतसिंहाचें सहाय्य मिळविण्याचा होता

हें स्पष्ट आहे. म्हणून मार्गातल्या याच शीख संस्थानीकांना अनुकूल करून घेण्यास होळकराच्या वकीलांनीं प्रयत्न केला ही गोष्ट कालक्रमाच्या टांचणावरून स्पष्ट आहे. कसलाच उपसर्ग लागू न देतां झिंद व कैथल संस्थानातून यशवंतराव पतियाळात शिरला; तेथील प्रकारानें यशवंतराव बुचकळ्यात पडला असेल; राजा साहेबसिंगाची व आसा कुंवर राणीची तडजोड साधतां न आल्यानें यशवंतराव अमृतसर येथें गेला आणि रणजीतसिंहाला भेटला. "शिखांचा शह" या पुस्तकांत याच ऐतिहासिक भेटीच्या संभाषणाचा विषय असल्यानें येथें रणजीतसिंहाचे अल्प चरित्र देणें सयुक्तिक होईल. याशिवाय याच वर्षी खि. शक १९३९ जुलै दिनांक २९ ला रणजीतसिंहाचा शतसांवत्सरीक उत्सव साजरा झाला; म्हणून त्याचें संक्षिप्त चरित्र पुढें दिलें आहे.

रणजीतसिंह (१७८० ते १८३९) :—सुकरचाकिया मिसलचा पुढारी चतरसिंग होता. "सुकरचक्र" गांवाच्या नांवानें या मिसलचें नांव पडलें होतें. तोफ डागीत असतां चतरसिंग ठार झाला. त्याचा मुलगा महानसिंह पराक्रमी होता. झिंदच्या भागसिंहाची बहीण राजकंवर महानसिंहाला दिली होती. तिजपासून महानसिंहाला खि. शक १७८० त पुत्ररत्न झालें. मुलाचें नांव "रणजीतसिंह" ठेविलें. १७९२ त महानसिंह मरण पावला. लखपतराय कारभाऱ्याच्या हातात राजसत्ता होती. खि. शक १७९३ त रणजीतसिंह शिकारीस गेला असतांना वाट चुकून नबाबशहाच्या तावडीत सांपडला होता. महानसिंहानें त्याचा दोन-चारवेळा पराभव केला होता; यामुळे चिडलेल्या नबाबशहाने चोरून रणजीतसिंहावर अगदी जवळून वार केला. घोड्याचे तोंड वळवून रणजीतसिंहाने वार चुकविला आणि उलट तरवारीचा वार करून नबाबशहाचे डोके उडविले. भाल्याच्या

टोंकाला शत्रूचें डोकें खोचून तो आपल्या सोबत्यास जाऊन मिळाला. १७९६ त त्यानें कन्हैया मिसलची सोयरीक जोडली. बटाला येथें लग्नाचा थाटमाट उडाला.

खि. शक १७९७ त काबुलचा अमीर झमानशहा लाहोरपावेतों आला; रणजीतसिंहानें शहाला त्रस्त केले; शहा रिकाम्या हातानें परत गेला. १७९८ त नकई मिसलच्या ज्ञानसिंहाच्या बहिणीशी त्याचे दुसरे लग्न झाले. याच बायकोपासून (दाँतारकँवर नकई) सतघरा येथें पुढें १८०१ त खड्गसिंहाचा जन्म झाला. याच वेळीं लखपतराय*कारभारी वसुलीच्या झगड्यांत मारला गेल्यानंतर रणजीतसिंह स्वतंत्रतेने कारभार पाहू लागला. खि. शक १७९९ जुलाई दिनांक ६ ला त्याच्या सासूनें–सद्दाकँवरनें–प्रत्यक्ष सहाय्य केल्यानें त्यानें लाहोर जिंकलें. शीख लोकांचें पवित्र धर्मक्षेत्र त्याच्या हातीं आल्यानें खालसा सरदारांत त्याची प्रतिष्ठा वाढली. भांगी मिसलची प्रसिद्ध झम-झमा Zam-Zama तोफ त्याने काबीज केली. अब्दालीसाठी ओतविलेली हीच झम-झमा तोफ रणजीतसिंहाच्या पुढील स्वाऱ्यांत गर्जू लागली. लाहोरच्या पदार्थसंग्रहालयांत तीच तोफ ठेविली आहे. पठाणकोट, सियालकोट, शेखपुरा वगैरे दुर्गम दुर्ग रणजीतसिंहाने जिंकले होते. त्याच्या शौर्य प्रतापाने खालसा सरदार दिपून गेले. त्याच्या शौर्य-धैर्यादी गुणांचे वर्णन संत निहालसिंगाच्या शब्दांत देणें योग्य होईल. "He was provided with plenty of opportunity to learn the practical science of warfare; with his one eye he could see his mark more quickly & correctly than his companions.

* " Ranjitsinha " : by Shree Sitaram Koholi, Principal, Govt. Intr. College, Hoshiyarpur (Punj.) या पुस्तकाचा टंडन यांनी केलेला हिन्दी अनुवाद १९३८ त प्रसिद्ध झाला.

His hand had grown so swift at the draw that his flashing steel was dealing deadly strokes before the enemy knew what was happening. His aim was unerring. He hit hard and was endowed with lionlike courage. No odds could daunt him." १८०१ मधील खड्गसिंहाच्या जन्मोत्सवप्रसंगीं दरबारांत जमलेल्या सर्वजणांसमोर बाबा साहबसिंग बेदीनें रणजीतसिंहाला टिळक लावला. रणजीतसिंहानें "महाराजा" पद ग्रहण केले. नानकशाही नाण्याचे रुपये पैसे चालू झाले. सर्व प्रकारें राज्याचा बंदोबस्त केला.

१८०५ च्या डिसेंबरांत मराठे–शीख संघ साधण्याचा यशवंतरावाचा प्रयत्न इंग्रजी कारस्थानामुळें फसला. पूर्व बाजूनें दिल्लीची पकड पक्की होताच इंग्रजांनीं सतलज नदीजवळ रणजीतसिंहाला पायबंद घातला. त्यानें सतलज नदीच्याखाली दक्षिणेस उतरू नये म्हणून १८०८ सप्टेंबर दिनांक ११ ला मेटकॉफने त्याच्याशी तह केला. तहानंतर दुसऱ्याच महिन्यात आक्टोंबरात मेटकॉफच्या धमकावण्यांना भीक न घालतां रणजीतसिंह सतलज नदी उतरला. फरीदकोट, अंबाला आणि इतर जागीं लष्करी ठाणी बसवून तो परत फिरला. इंग्रजी कारस्थानाच्या गळास लागलेली शीख संस्थाने निसटण्याची संधी दिसू लागली. १८०९ जानेवारीत कर्नल आक्टरलोनी इंग्रजी पलटणीसह लुधियानाजवळ येताच रणजीतसिंहाच्या आक्रामक धोरणाला विटलेल्या शीख संस्थानीकांना हायसे वाटले. पहिल्याने रणजीतसिंहाने लढाईची तयारी करून मोठा आव आणला होता. पांच वर्षांपूर्वी होळकराला इंग्रजाविरुद्ध सहाय्य नाकारणाऱ्या याच पंजाबच्या रणजीतसिंहाला आतां दूरदर्शीपणानें मूग गिळून त्याच इंग्रजांच्या शर्थी मान्य करणें भाग पडले. पालीसमोर विंचू आपली नांगी टाकतो त्याप्रमाणें इंग्रजांच्या प्रभावानें रणजीतसिंह अगदी दबून गेला होता. हा मुद्दा संत निहालसिंगाच्या

उताऱ्यावरून स्पष्ट होतो. "When he found that the object could be obtained only by ranging the British against him, he cried a halt. This sense of compromise distinguished the Maharaja from his compatriots. It exposed him to the criticism of his courtiers and outsiders alike. Some of them sought to induce him to see the errors of his ways; some taunted him with cowardice. He was a jibber and deaf to entreaty." याचाच परिणाम म्हणजे वंश खुंटल्यानें भांगी मिसलची कारभारसूत्रें इंग्रजांनीं हस्तगत केली. लुधियानाजवळ इंग्रज सैन्य पूर्वीच बसले होते. इंग्रजी तळ १८०९ मध्यें फिरोजपूरात पडला; तरूण मेटकॉफनें आणि लॉरेन्सनें रणजीतसिंहावर आपले वजन बसविले होते.

आतां इंग्रजी कवायती फौजेचें महत्व रणजीतसिंहाला पटले होते; म्हणून कणखर बनलेल्या धर्मवेड्या शीखांचे रणजीतसिंहानें क्रामवेलच्या Iron-sides सारखे पाश्चिमात्य सेनानायकांनीं* शिस्त शिकविलेले एक मोठें अजिंक्य दल निर्माण केले होते. शीख पंथाचा संस्थापक गुरू नानक होय. मुसलमानांच्या अनन्वित छळानें शीखसमाज प्रतिकारक्षम झाला होता. विशिष्ट प्रकारच्या शिकवणीनें शिकलेल्या शीखाचे Disciple and learning धर्मवेड परिस्थितीनें तावून सुलाखून निघाले होते. पाण्यानें भरलेल्या पेल्यांत टाकलेल्या खडीसाखरेच्या खड्याला सुरीनें ढवळतात; त्यातले थोडे अंगावर शिंपडून उरलेले तीर्थ पीण्यास देतात. या संस्कारानें भारलेला

---

* रणजीतसिंहाच्या सैन्यांत सुमारें चाळीस पाश्चिमात्य अधिकारी होते. The skill and the tenacity with which the Sikh army fought the British in two desperate campaigns show with what success these officers and their assistants served Ranjitsingh.

[Memoirs of Alexander Gardner: published in 1898.]

गुरूजीचा " खालसा " शिष्य शीख होतो. " खालिस " Picked or selected या उर्दु शब्दापासून " खालसा " शब्द झाला आहे. खालसा शब्द पवित्रतेचा Purity वाचक होय; खालसा म्हणजे मुक्त झालेला Liberated or free. गुरू गोविन्दसिंगाच्या प्रेरणेनें शीख समाज युद्धोन्मुख झाला होता. शिस्तींत लढण्याचें कौशल्य संपादलेल्या अशा कणखर शीखांचे पलटणींनी व घोडदळाच्या सहाय्याने दक्षिणेस मुलतान, पश्चिमेस पेशावर, आणि उत्तरेस काश्मीरपावेतों रणजीतसिंहाचें राज्य लवकरच पसरले.

कोहिनूर मिळण्याच्या बेगमांच्या वचनावर रणजीतसिंहानें खि. शक १८१३ त पळपुट्या शहासुजाला काश्मीरहून सोडवून लाहोरला आणलें होते. पुढें वचनभंगाचा प्रयत्न उघड होतांच शहासुजावर चौक्या बसल्या; शेवटीं रणजीतसिंहानें त्याच्यापासून कोहिनूर हीरा हिसकला. हा सुप्रसिद्ध हीरा नादीरशहाला दिल्लीच्या लुटीत मिळाला; तो त्यानें अफगाणिस्थानांत नेला होता. १८१४च्या नोव्हेंबर महिन्यांत शहासुजाच्या बेगमा लाहोरहून पळाल्या; आणि लुधियानाला इंग्रजी आश्रयाखालीं जाऊन दडल्या. दुसऱ्या वर्षी शहासुजा देखील वेषांतर करून निसटला आणि १८३८ पावेतों इंग्रजी पेनशन खात बसला. १८१८त मोठा पराक्रम गाजवून रणजीतसिंहानें मुलतान जिंकले. दुसरेंच वर्षी काश्मीरचे राज्य त्यानें आपल्या राज्यास जोडले. १८२० पावेतों रणजीतसिंहानें आपली पंजाबची पकड पक्की केली होती. पेशावर हिसकण्यासाठीं १८३५ त दोस्तमहंमदानें केलेला प्रयत्न फसला. दोस्त महंमदाकडे चाळीस पन्नास हजार कडवे अफगाणी सैन्य होते. त्याच्या जोडींला ऐशीं नव्वद हजार गाझीज Ghazis बाजारबुणग्यांचें सैन्य बरोबर होते. खैबर घाटाच्या तोंडाशी हें सैन्य येऊन

थडकले. या बातमीची गुणगुण कळताच रणजीतसिंह आपल्या साठ हजार शीख सैन्यासह त्यांना सामोरा गेला. " Francese Campo " or Model Brigade फ्रेंच रणधुरंधरांनीं शिकविलेला वीस बावीस हजारांचा कंपू होता; त्याला " फौज खास " म्हणत. Allard, Ventura, Avitablie and Court हे चौघेजण "फौज खास" कंपूसह मोठा चक्कर साधून शत्रूच्या डाव्या बगलेवर जाऊन बसले. उभय पक्षाकडून गोलंदाजीची झड सुरू होती. लहान मोठ्या चकमकी प्रत्यही झडून शे दोनशे शीख कामी येत होते. दोन्ही सैन्यातील अंतर दीड दोन कोसापेक्षां ज्यास्त नव्हते. शत्रूची उजवी बगल आणि आघाडी रणजीतसिंहानें स्वतः सुमारे दीड महीना सांभाळली होती. " फौज खास " कंपू ठराविक स्थळीं पोहोचताच हल्ला करण्याचे निश्चित ठरलें. आपल्या सर्व सैन्याची बाकी चार घटकेंत चुकती करून एक महीन्याचा रोजमुरा त्यानें आगाउ दिला. दुसरे दिवशीं पहाटेच्या प्रहरीं सर्व सैन्य बाहेर पडले. इतक्यात सैनिकांच्या पुढच्या रांगेतून शत्रू पळाल्याची ओरड झाली. अफगाण सैन्यानें आदल्या दिवशींच खैबर खिंड ओलांडली होती. रणजीतसिंहाचा वकील *अझीमुद्दीन अफगाणाशी तडजोड साधण्यासाठी खटपट करीत होता. सरदार हरिसिंग नलुवा याची पेशावरात नेमणूक करून रणजीतसिंह लाहोरला परत आला. हिंदु मंदिरांना देणग्या देण्याच्या कामीं रणजीतसिंहाचा हात सढळ होता. काशी–विश्वनाथ मंदिराचा गाभारा मढविण्यास त्याने ३३ मण सोनें दिलें.

खि. शक १८३७ त दोस्त महंमदचा मुलगा सरदार महंमद अकबरखानानें वीस पंचवीस हजार अफगाण सैनिकासह खैबर घाट

* फकीर अझीमुद्दीन आणि नुरुद्दीन हे वैद्य बंधुद्वय रणजीतसिंहाचे वकील होत. त्यांचे रणजीतसिंहावर फार वजन होते.

ओलांडला. एप्रिल ३० ला जमरूडजवळ झालेल्या लढाईत हरिसिंग नलुवा मारला गेला. दिवाण ध्यानसिंग दहा बारा हजार घोडदळा-सह वेगानें जमरूड येथें पोहोंचला; शीख सैन्य आलेले दिसताच मिळाली तेवढी लूट घेऊन अकबरखान काबुलकडे निसटला.

१८३९ जून दिनांक २९ ला रणजीतसिंह मरण पावला. पुढें शीख युद्ध जिंकून इंग्रजांनीं कोहीनूर इंग्लंडांत नेला; आतां तो इंग्लंडच्या राजमुकुटावर झळकत आहे. रणजीतसिंहाच्या पश्चात शीखांना युद्धांत खेचण्यासाठीं इंग्रज मुत्सद्दी निमित्तास टेकले होते. आठ दहा वर्षांच्या आंत इंग्रजी सत्तेचा निदर्शक असा लाल रंग पंजाबावर फासला गेला. छत्रपति शिवाजी महाराजांनी मराठी साम्राज्याची मुहूर्त-मेढ रोंवली; नंतर त्याचा प्रचंड वृक्ष झाला; पुढें दीडशें वर्षांनंतर मराठी साम्राज्याचा नाश झाला. इकडे शीखांचे साम्राज्य रणजीतसिंहानें स्थापन केलेः पण त्याच्या पश्चात फक्त दहा वर्षांच्या आतच शीख साम्राज्याचा अस्त झाला.

यशवंतरावाचे चरित्र गोष्टीरूपानें लिहिलेले आहे. माझ्या हस्त-लिखितावरून त्या चरित्राची रूपरेखा निरूपणांत वाचकासमोर मांडली आहे. यशवंतरावाच्या चरित्राचे मुख्य भाग तीन पडतात.

१ जन्मापासून खि. शक १७९७ मल्हारगर्दी पावेतों;
२ पुरुषार्थाचा काल; खि. शक १७९७ ते १८०६
३ उत्तरार्ध; खि. शक १८०६ ते १८११.

"शिखांचा शह" समजण्यास १८०६ पावेतोंच्या इतिहासाची आवश्यकता आहे; म्हणून पहिल्या दोन भागाची रूपरेखा तेवढी येथें लिहिली आहे. पहिला भाग लिहिण्यास माहिती अगदीं थोडी आहे. दुसरा भाग म्हणजे पुरुषार्थाचा काल; त्याची चार प्रकरणे पाडली आहेत—

१ यशवंतराव सत्ताधारी कसा झाला ? खि. शक १७९७–९९.
२ शिंदे होळकराचा गृहकलह; १७९९ ते १८०२ आक्टोबर.
३ सोबती सरदारांची तडजोड १८०२ आक्टोबर ते १८०४.
४ होळकर इंग्रज युद्ध खि. शक १८०४ ते १८०६ जानेवारी.

या गोष्टी प्रसिद्ध झाल्या असत्या तर इतके लांबलचक निरूपण करण्याचे प्रयोजन नव्हते; पण " शिखांचा शह " समजण्यास केलेल्या या चरित्राच्या निरूपणानें वाचकांना सोयीचे होईल. आर्थिक कोंडींत मी सर्व बाजूनें फसलो आहे. माझे यशवंतरावाचे चरित्र प्रसिद्ध होण्याची काळजी त्या दयाघनावाचून इतर कोण करणार ? महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध ऐतिहासिक किर्तनकार ह. भ. प. डॉक्टर **पटवर्धनबुवा** यांनी माझे यशवंतरावाचे चरित्र ऐकून मला प्रोत्साहित केले. माझ्या गांवकऱ्यासमोर कीर्तनप्रसंगीं होळकरांच्या इतिहासाच्या माझ्या अभ्यासाविषयीं ओळख पटवून त्यांनी मला उत्तेजित केले. त्याच उत्साहाच्या भरांत दहा महिन्यापूर्वी लिहिलेला ' शिखांचा शह ' आजपावेतो पडून होता; पण श्री. डॉक्टर श्रीधर नारायण शार्ङ्गपाणी यांनी माझा भार हलका करण्याचे मनांत आणल्यानेच आज प्रकाश पहाणाऱ्या लेखाला जन्म देण्याचें श्रेय त्यांनाच आहे. याशिवाय अनेकांनी मला सहाय्य केले आहे. त्या सर्वांचे इष्ट चिंतून हे निरूपण मी पुरे करतो.

शुक्रवार, गणेशचतुर्थी.
(टिळक पंचांग)
भाद्रपद शुद्ध ४ शके १८६१.

दामोदर बळवंत दांडेकर.

शिखांचा–शह

अथवा

व्यासघाटचा होळकर–इंग्रज तह १८०६

प्रवेश पहिला.

स्थळः—व्यास[1]–गंगेचा घाट; होळकरांची छावणी.

गोविंदभटः—अरे बापरे ! किती कडक थंडी ही ! मला वाटलें माळवा प्रांतातली थंडी फारच कडक असते ! पण या पंजाब प्रांतांतलें थंडीचें मान अगदीच भलतीकडे ! या साठीच मी सारखा ओरडत होतो कीं, स्वारी बरोबर चलण्याची माझी मुळीच इच्छा नाहीं. पण माझ्या या हाकाटीकडे कोण लक्ष्य देणार ? परवा शतद्रू[2] गंगेचें स्नान घडलें ! आज व्यास गंगेच्या पवित्र जलानें देवांना अभिसिंचन करणार ! स्वारींतील मंडळी आपापसांत कुजबुजतात कीं, आपणाला यापुढें यावनी

---

१ व्यास-घाटः—पंजाबातील पांच नद्यापैकी बिआस Beas or Bias म्हणजेच व्यासगंगा होय. Beas येथें होळकर-इंग्रज तह खि. शक १८०६ जानेवारीच्या प्रारंभी झाला.

२ शतद्रुः—सतलज नदीचे संस्कृत नांव शतद्रु; flowing in thousand channels सहस्रावधी धारांनी वाहणारी.

मुलखांतून जावें लागणार ! जें काय होणार असेल त्याची काळजी एकट्या मल्हारी म्हाळसाकांताच्याच डोक्यावर आहे.

ग्यानबाः—[प्रवेश करून] गोविंदभट, सेवाधर्म फुकटचा नसतो; श्रीमार्तंडाची भंडार-पेटी महाराजापुढें नुसती धरण्याच्या क्षुल्लक कामाचा देखील तुला येवढा कंटाळा वाटतो, तर शीर हातावर घेऊन लढणाऱ्या शिपाई गड्यांचें कसें होत असेल ? सैनिक कामगिरीची खरी खरी गर्दी आणि परिक्षेची कसोटी वारा, पाऊस आणि उन्हातान्हांतच असते ! शत्रूवर छापा घालण्यासाठी अमावास्येच्या गडद अंधाऱ्या काळ-रात्रीला आम्ही सैनिक लोक सुमुहूर्त समजत असतों. मल्हार गर्दीपासून[1] आजपावेतों एक क्षणाचा देखील विसावा घेण्यास सवड नाहीं. महाराजांच्या जीवाचा कोण आटापीटा झाला असेल ? खरा पुरुषार्थी पुरुष ! लेच्या-पेच्या बांडगुळाचें हें काम नव्हे ! उलट सुलट लष्करी डाव पेचांची तर शिकस्त झाली ! इंग्रजांशी युद्ध[2] जुंपल्यास आज दीड वर्ष झालें. इंग्रजी सेनानींची चिकाटी जबर ! पावसाळा संपण्यापूर्वींच इंग्रजी फौजा रेवाडीच्या आसपास जमूं लागल्या.

---

१ मल्हारगर्दीः—मल्हाररांव हा तुकोजी होळकराचा औरस पुत्र होता; त्याला धरण्याच्या गडबडीत पुणें राजधानीत तो शिंद्याच्या लोकाकडून ठार झाला; ही मल्हारगर्दी खि. शक १७९७ सप्टेंबरात झाली.

२ खि. शक १८०४ एप्रिल महिन्यात होळकर-इंग्रज युद्धाला प्रारंभ झाला.

गोविंदभट:—नेमक्या त्याच ठिकाणीं इंग्रजी पलटणी गोळा होताच त्यांचा कावा स्पष्ट झाला. मियानपुरास[1] असतांना आम्हाला ही गोष्ट उघड दिसत असून देखील कांहींच करतां येणें शक्य नव्हतें. इकडे इंग्रजाविरुद्ध दौलतराव महाराजांना आपणाबरोबर ओढण्याचा महाराजांचा डाव फसला. होळकरांचा तोफखाना आणि पलटणी शेखावाटींत[2] आश्रयार्थ तळ देऊन बसल्या होत्या; शेखावाटीच्या समोर पूर्वेस रेवाडी; तेव्हां होळकरांच्या एकाकी सैन्यावरच इंग्रजांचा शह बसला; हा त्यांचा डाव महाराजांनीं ओळखला. इकडे मागाहून येऊं असें उडवा उडवीचें उत्तर देणाऱ्या दौलतरायाची वाट पाहात, आम्हीं अजमेरांत तेवीस चोवीस दिवसपावेतों स्वस्थ बसलो होतो. तेथें असतांना राणाजींचें आणि महाराजांचें एकलिंगजीच्या[3] मंदिरांत खलबत झालें; शिंद्यांच्या वतीनें सर्जेराव[4] घाटगे उपस्थित होते.

---

१ मियानपुरः—हे गांव कोटा आणि चितोडगड यांच्या मध्यंतरी आहे.

२ शेखावाटीः—जयपूर राज्यातील एका प्रांताचे नांव.

३ एकलिंगजीः—हे सुप्रसिद्ध शिवमंदीर उदेपूर संस्थानात आहे. राणाजी आणि शिंदे-होळकर भेटले असे मेवाडचा इतिहासकार म्हणतो; शिंद्याचे नांव करून होळकराच्या पक्षास मिळू पाहणारा सर्जेराव तर उपस्थित झाला नसेल ?

४ सर्जेराव घाटगेः—मराठेशाहीच्या या कलीपुरुषाचे नांव सखाराम घाटगे होते; तो कागलचा राहणारा होता; त्याचे बरेच

पण असल्या महत्वाच्या कामीं प्रत्यक्ष धन्याशिवाय निभावणी होत नसते. या प्रकरणीं कांहींच निष्पन्न न झाल्यानें महाराजांनीं आपली मंडळी आणि अवजड सामान जोधपूरकरांच्या राज्यांत सुरक्षित जागीं ठेविलें, आणि आपण युद्धाच्या तयारीनें शत्रूशीं झुंजण्यास सडे झाले.

ग्यानबाः—सबळगड[1] येथें झालेली सोबत्यांची भेट उपरी ठरली; उभयतांची तडजोड साधणें अशक्य ठरलें. ही गोष्ट स्पष्ट झाल्यानंतर देखील इतका विलंब होण्याचें काय कारण ?

गोविंदभटः—परक्या ताम्राविरुद्ध[2] एकट्यानें तोंड देणें अवघड होतें, ही गोष्ट महाराजांना पटली आहे. भरतपूरच्या

आयुष्य नाना फडणिसाजवळ गेलेः त्याच्या मुलीला " दक्खनची बिजली " म्हणत; मुलीचे लग्न तरूण दौलतरावाशी लावून सर्जेराव शिंद्याचा सासरा–कारभारी झाला. हीच मुलगी पुढें " बाजयाबाईसाहेब शिंदे " या नांवाने प्रसिद्ध झाली. खि. शक १८०१ आक्टोंबर इंदूर येथील लढाईत यशवंतराव होळकराविरुद्ध शिंद्याचा सेनापति सर्जेराव होता. खि. शक १८०९ मध्यें जांवयाच्या—दौलतरावाच्या आज्ञेने आनंदराव फाकड्याने सासऱ्याचे—सर्जेरावाचे डोके उडविले. मानाजी फाकड्याचा पुत्र आनंदराव होय. फाकड्याचा (शिंद्याचा) वंश बडोद्यात नांदत आहे. (रा. रा. लेले यांनी सर्जेरावाचे चरित्र यशवंत मासिकात प्रसिद्ध केले आहे.)

१ सबळगडः—हे गांव ग्वाल्हेरच्या पश्चिमेस आहे.

२ ताम्रः—इंग्रज.

वेढ्यानंतर जाटांनीं इंग्रजाशीं तह केला. इंग्रजांच्या दबावानें दबलेले राजपूत राजे-रजवाडे त्यांच्याविरुद्ध उघडपणें सहाय्य करण्यास कचरतात; अंबूजी इंगळ्यावर इंग्रजांची छाप पूर्वींच पडली, यामुळे अलीगड वगैरे शिंद्यांचीं उत्तरेतील कित्येक मजबूत ठाणीं इंग्रजी सत्तेच्या कक्षेंत सहजासहजीं आलीं; ही गोष्ट उघडपणें माहीत असतांनाही, अंबूजी इंगळ्याचें प्रस्थ पुन्हां शिंदे-दरबारांत जमलेलेंच होते. अशानें शिंद्यांच्या सहाय्याची अपेक्षा फोल ठरली. भोसले येथून फार अंतरावर असल्यानें त्यांची उठावणी करतां येणें अशक्य ठरलें.

---

१ भरतपुरचा वेढाः—ख्रि. शक १८०५ जानेवारी दिनांक २ ला लेक सेनापतीने भरतपुरास वेढा दिला. किल्याच्या आंत जाट आणि बाहेर होळकर अशा जोड शहानें उभयतांनी इंग्रजांना त्रस्त केले. निकराचे चार हल्ले चढवून देखील इंग्रजांचे प्रयत्न निष्फळ ठरले. फेब्रुआरी दिनांक २४ ला वेढा उठवून लेक भरतपूरच्या इशान्येस जाऊन बसला. एप्रिल दिनांक ९ ला भरतपूरच्या रणजीतसिंगाने इंग्रजाशी तह केला.

२ अंबुजी इंगळेः—शिंद्याचा सेनापति होता; इंग्रजास अनुकूल झाल्यामुळें लोक त्याच्या स्वामीनिष्टेविषयीं शंका घेऊ लागले. इंगळे याजपासून पैसे उकळण्यास दौलतरावाने त्याला यशवंतरावाच्या स्वाधीन केलें; उकळलेल्या रकमेच्या वाटणीच्या घासाघाशीनें शिंदे-होळकरामध्यें संशयाचे वातावरण मात्र ज्यारतच बळावलें.

पेशवा[१] तर प्रथम पासूनच महाराजांना सर्वस्वी प्रतिकूळ. अशा प्रकारें स्वकीयांच्या सहाय्यास महाराज सर्वस्वी आंचवले. इकडे पावसाळा संपतांच इंग्रजी सैन्याचा ससेमिरा पाठीस लागला, आणि मोहिमेस प्रारंभ झाला.

ग्यानबाः—शेखावाटींत तळ देऊन बसलेल्या आपल्या सैन्याची बातमी घेवून मी अजमेर येथील छावणींत येऊन पोहोचलों. तेव्हांपासून मी महाराजांच्या सैन्याबरोबर आहे. पण गोविंदभट, गंगेचें स्नान करून महाराज अमृतसराकडे जाण्यास निघणार; तेव्हां देवाची पूजा उरकून तयार होण्यास तुला बजावून सांगण्यासाठी मला पुढें पाठविलें.

गोविंदभटः—वाः ! चांगलें ! लवकर आठवण दिलीस ! रणांगणाकडे निघण्याच्या वेळीं मार्तंडाचा भंडार लावीत असतांना महाराजांना पहाण्याचा प्रसंग तुला क्वचितच लाभला असेल !

ग्यानबाः—तसें नव्हें ! भाला धारण केलेली आपल्या महाराजांची नारसिंह मूर्ति पहिल्या प्रथम पाहतांच मी देखील दचकलों ! त्यांना पाहून शत्रूच्या अंगाला थरकाप कां सुटतो हें कोडें मला तेव्हांच उलगडलें. बरं तें असो ! लवकर पुढें

---

१ पेशवाः—विठूजी होळकराच्या वधास कारणीभूत झालेल्या लोकांनीं बाजीरावास ज्यास्त भिवविले; यामुळें पेशवा-होळकरांचे दर्शन दुर्लभ झाले. (खि. शक १८११ जानेवारीत बाजीरावानें साताऱ्यास लिहिलेले पत्र काव्येतिहास संग्रह पत्र नं. ४५० पान ४४५.)

जाऊन महाराज येण्यापूर्वी तूं पूजा उरकून ठेव; तुला देखील स्वारीबरोबर अमृतसरास जावें लागेल.

(पडद्यांतः—गोविंदभट ! अरे गोविंदभट ! स्नानासाठीं महाराज गंगेवर गेले ! अद्याप तूं येथेंच रेंगाळत आहेस.)

गोविंदभटः—आलों बरं, हा निघालोंच. (जातो)

ग्यानबाः—[स्वगत] अजमेरहून व्यासगंगेच्या तटाकीं येईपावेतों इंग्रजी पलटणीशीं हुतुतूच्या डावासारखा एकसारखा धिंगाणा सुरूं आहे; लहानपणच्या त्या खेळांतले गडी मोजके आणि क्षेत्रही पण आखलेलें! आज या खरोखरीच्या धांगड-धिंग्यांत अजमेरपासून शीखांच्या राज्यापावेतो अफाट[1] रंगण पसरलें होतें. तसेच बाळपणी खेळलेल्या या लुटुपटीच्या खेळातले गडी अगदी मोजके असत; आतां आमच्या बाजूस तीस पस्तीस हजार घोडदळाची धामधूम; त्यांतच तोफांचें लटांबर; आणि त्याला पंधरा सोळा हजार संरक्षक पायदळाची जोड. विरुद्ध पक्षाजवळ साधनसंपत्तीनें सुसज्ज असलेलें अगणित मनुष्यबल खडें असलेलें दिसत आहे. तशात इंग्रजांच्या दमदाटीनें हिंदुस्थानांतील निर्बल सत्ताधारी दिङ्मूढ बनलेले! आमच्या शत्रूकडे अशी अनुकूल परिस्थिती असतांही त्यांच्या डोळ्यांदेखत अनेक हुलकावण्या दाखवीत आम्ही आज व्यासघाटावर आहोंत.

---

१ अफाट रंगणः—मियानपुरपासून अमृतसरपावेतो सुमारे सव्वासहाशे मैलांचे अंतर आहे.

अनेक आणीबाणीचे प्रसंग ओढवले तरी आम्ही सुखरूप निसटलो; पण शेखावाटींत मागें ठेविलेल्या आपल्या सैन्याविषयीं महाराजांना मोठी धाकधुक वाटे ! म्हाळसाकांताच्याच कृपेनें हे लष्कर पतियाळा सोडल्यावर आम्हाला येऊन मिळालें. पाठलाग करणाऱ्या इंग्रजी पलटणींना या लष्करानें कसा गुंगारा दिला याचा उलगडा हरनाथदादा भेटल्याशिवाय होणार नाहीं. अरे वा: ! समोरून कोण येत आहेत ?

(हरनाथदादा प्रवेश करतात, आणि परस्परास रामराम करतात.)

हरनाथदादा:—कोण ग्यानबा ? वाहवा ! खासे ! आमच्या-पासून बातमी घेऊन निघालास आणि अजमेरास जाऊन महाराजाजवळ सुखरूप आनंदांत बसलास ! तिकडे मात्र शेखावाटीच्या समोर पूर्वेस नारनोळ येथें आर्मस्ट्रांग, तैलंगणांतील पलटणीसह खरोखरी येऊन थडकला; महाराजांना बोलावण्यासाठीं तुझ्या मागोमागच आम्ही सांडणीस्वार पाठविले.

ग्यानबा:—अजमेरास पोहोंचतांच मी तुमच्याकडोन आणलेली शेखावाटींतली बातमी महाराजांना सांगितली. म्हणून दुसरेच दिवशीं स्वारी जयपूरच्या रोखानें निघून सखून गावीं

---

१ हरनाथदादा:—हा होळकरांचा लेकवळा; अर्थात त्याची गणना कुंवर मंडळीत होती. हरनाथाचे यशवंतरावाशी फारच हितगुज होते. यशवंतरावाच्या चरित्रात त्याचे नांव जागजागी आढळते.

पोहोचली. सांबरहून सरळ अजमेरास गेलेले तुमचे सांडणीस्वार चक्कर खाऊन सखून गांवीं आले; इकडे महाराजांचें दैव सबळ ! जयपुरकरांची भेट घेऊन वकील नुकतेच परतले होते; यामुळें तिकडील बाजू अगदी निश्चित झाली होती. लागलीच दिशा बदलून महाराजांचा तळ सांबर सरोवराजवळ येऊन भिडला.

हरनाथदादा:—याच सुमारास आर्मस्ट्रांगच्या पलटणी नारनोळहून पुढें हालचाल करूं लागल्यानें आम्ही पेंचांत सापडलो होतो.

ग्यानबा:—ही हालचाल महाराजांच्या लक्ष्यांत आली; म्हणूनच होळकरांचें घोडदळ सांबर सरोवराजवळून लांबलांब पल्ल्याच्या मजलीनें नारनोळाच्या पश्चिमेस कोंडाला येथें येऊन पोहचलें. या बातमीनें पुढें चाल करून सरकणाऱ्या आर्मस्ट्रांगचे धाबें दणाणलें; त्यानें काढता पाय घेतला आणि तो दिल्लीच्या रोखानें गोवळगडापावेतों मागें हटला.

हरनाथदादा:—नारनोळ आणि शेखावाटीच्या मध्यंतरीं कोंडाला गांव वसलें आहे; तेथें महाराजांच्या आगमनाची वार्ता कळतांच मी त्यांना समक्ष जाऊन भेटलों; खलबत झालें; महाराजांच्या सैन्याबरोबर मोठें अंतर राखून कूच करण्याचें ठरलें; उत्तरेस असलेल्या टेकड्यांच्या आश्रयानें दडत जाऊन पतियाळाजवळ महाराजांच्या सैन्यांत मिळण्याविषयीं मला निश्चित आज्ञा झाली.

ग्यानबाः—आणि येवढ्याचसाठीं पाठ दाखवून मागें परत फिरलेल्या आर्मस्ट्रांगचा आम्ही जाणून बुजून पाठलाग केला नाहीं. कोंडाल्याहून होळकरांचें घोडदळ शत्रूला हुलकावण्या दाखवीत जें निघालें तें सरळ रेवाडीच्या वायव्येस चर्खी-दाद्रीस इंग्रजी सैन्यासमोर उभें राहिलें.

हरनाथदादाः—चर्खी-दाद्रीस तळ देऊन बसल्यामुळें रेवाडीच्या इंग्रजी लष्करासमोर महाराजांच्या घोडदळाचा आड-पडदा उभा झाला. या योगानें आमच्या पायदळाला आणि तोफखान्याला हांसीचें ठाणें सहज गाठता आलें. शेखावाटींतून हांसीपावेतों मोकळें मैदान असल्यानें टेकड्यांचा आश्रय तेथें अगदींच थोडा होता; अर्थात् अशा जागीं शत्रूच्या हल्ल्याची जास्त भिती वाटणें साहाजिक होतें.

ग्यानबाः—रेवाडीच्या इंग्रजी लष्कराला आह्मी गुंगारा दिला. चर्खी-दाद्रीहून उत्तरेकडे आह्मी झिंदच्या रोखानें निसटलों. चर्खी-दाद्रीचा कसबा, झिंद संस्थानच्या मालकीचा. तेथील राजा भागसिंग इंग्रजी दबावाने दबलेला. अर्थात् झिंदवाला महाराजास प्रतिकूल. तेथें डाळ शिजणें नाहीं हें ओळखून, आह्मी कैथल येथें गेलों. कैथलच्या भैयालालसिंगानें आम्हास टाळा दिला. त्यानें झिंदच्या भागसिंगाचेंच अनुकरण केलें. म्हणून आह्मी पतियाळा संस्थानांत शिरलों.

---

१ चर्खी-दाद्रीः—या दोन गांवामध्यें आठ मैलांचे अंतर आहे.

हरनाथदादा:—इकडे महाराजांच्या सैन्यानें चर्खी-दाद्री सोडून जातांच शत्रूला मोकळी वाट सांपडली. कर्नल बॉल आणि रिचर्डसनच्या पलटणी लागलीच आमच्या आंगावर हांसीच्या रोखानें चाल करून आल्या. चपळाईनें आम्ही जंगलानें व्याप-लेल्या टेकड्यांचा आश्रय घेतला. शत्रूला आमचा सुगावा काढतां येऊं नये यासाठीं खोट्या अफवा पसरवून आह्मी भलत्याच ठिकाणीं प्रकट व्हावें. पतियाळास येऊन मिळण्याविषयीं महा-राजांनी निश्चित आज्ञा दिली होती. इकडे बर्न्सच्या पलटणींनी आमचा पाठलाग चिकाटीनें चालविला होता; तेव्हां त्यांना चकविण्यासाठीं आम्हाला उलट-सुलट मार्ग आक्रमण करावे लागल्यानें या कामीं विलंब होणे अपरिहार्य झालें. अखेर मार्तंडाच्याच कृपेनें आह्मी पतियाळाच्या पुढेंच महाराजांच्या गोटांत दाखल झालों.

ग्यानबा:—तुम्ही जर आठच दिवस पूर्वी येऊन पोहों-चला असता तर मौज उडाली असती; आमच्याजवळ तोफखाना नसल्यानें पतियाळा संस्थानच्या उलाढालींत महारा-जांची बाजू पंगू ठरली. या राज्यांत आम्ही तेवीस चोवीस दिवस अडकून पडलो होतो. तेथें कवडीचा देखील फायदा पदरांत न पडतां स्वतःचीच पदरमोड झाली. तेथील राजा-राणींत भांडण जुंपलें होतें. राजा साहेबसिंगाची आई राजे-राणी कंवर स्वतःच्या सुनेशी असंतुष्ट असल्यानें तडजोडीस प्रतिकूल होती.

पतियाळा येथें गादीवर नेऊन बसविल्यास चार लक्ष रुपये देण्याचें राजा साहेबसिंगानें मान्य केलें. अस्कवर राणीला भिवविण्यासाठीं महाराज पतियाळाजवळ जाऊन भिडले; राणीनें प्रतिकाराची तयारी केली; तोफखान्यावांचून पतियाळा हस्तगत होणें कठीण, ही गोष्ट महाराजांनी तेव्हांच हेरली. तशात झिंदच्या भागसिंगानें अस्कवर राणीच्या सहाय्यार्थ धावून जाण्यास इंग्रजांना पत्रें पाठविली. इकडे साहेबसिंगाचें दुटप्पी वर्तन उघड दिसत होतें; अशात अस्कवर राणीनें अमीरखानामार्फत महाराजांना आपल्या पक्षास अनुकूल करून घेण्याचे धोरण राखिलें; कर्नाळहून इंग्रजी पलटणी पुढें चाल करून आल्या; इकडे कोणाकडोनहीं कांहींच न मिळाल्यानें निराशेनें रिकामे हात हलवीत इंग्रजी पलटणींच्या आगमनाच्या बातमीने आम्ही घाई घाईनें पतियाळा सोडला. आणि पुढें मालरकोटल्याच्या[१] मार्गांत तुम्ही महाराजांच्या सैन्यांत येऊन मिळाला.

हरनाथदादा:—मालरकोटल्यास झालेल्या खलबतांत मोठी खडाजंगी उडाली. तेथून वर सरळ उत्तरेस गेल्यास परत पुन्हां माळव्याकडे जाण्याचा मार्ग सुटतो; तसेंच बिकानेर संस्थानाला प्रदक्षिणेसारखा वळसा घालून रेताड मैदानांतून

१ मालर-कोटला:—मालर आणि कोटला ही दोन गांवे जवळ जवळ वसली होती; पण आता दोन्ही गांवाच्यामध्यें मोतीबाजार बसविल्यानें तीं एक झाली.

तोफांचे खटारे ओढीत नेणें फारच कठीण काम होतें; म्हणून त्यामार्गानें न जातां आह्मी वर रायकोट येथें जाऊन पोहोंचलों.

(जासूद प्रवेश करून हरनाथदादास उद्देशून म्हणतो.)

जासूदः—आपल्याच शोधांत होतो; महाराजांना भेटण्यासाठीं अमृतसराहून चिटणीसाकडून पांडूतात्या आले आहेत.

हरनाथदादाः—त्यांना बाहेर कां उभें केलेस ? जा, त्यांना इकडे घेऊन ये. (जासूद जातो.)

पांडुतात्याः—[प्रवेश करून] हा मी मागोमागच आलों आहे. सर्वांचें क्षेम कुशल आहे नां ?

ग्यानबाः—तें सर्व ठीक आहे; पण चिटणीसाचें तेथील काम यशस्वी झाले किंवा नाहीं ? रणजीतसिंहाचा दरबार काय म्हणतो ?

पांडुतात्याः—तें सर्व कांहीं सांगतों, पण रायकोटविषयीं काय म्हणत होता ?

ग्यानबाः—मालरकोटल्याहून आम्हीं पुढें रायकोट येथें गेलों. चिटणीस मालरकोटल्याहूनच अमृतसराकडे जाण्यास निघाले ही गोष्ट खरी नां ?

---

१ रायकोटः—रायांचा कोट; या रायांनी बांधलेले राजवाडे अद्याप रायकोट येथें दिसतात.

२ चिटणीसः—(चिठ्ठी-नविस=चिठ्ठी लिहिणारा) गिरीभाऊ चिटणीसाची पत्रें बरीच उपलब्ध आहेत. याच्या हाताखाली काम करणारी मंडळी चिटणीसाला तीर्थस्वरूप लिहीत; तसेच त्याच्या बायकोला मातोश्री म्हणून संबोधित.

पांडुतात्या:—होय ! आपण पतियाळा येथें जाऊन पोहोंचण्याच्या आधींच राजा रणजीतसिंहाचे आणि काबूलच्या अमीराचे वकील छावणींत येऊन पोहोंचले होते; म्हणून राजा रणजीतसिंहाकडे जसें आम्हाला मालरकोटल्याहून पाठविलें तसेंच काबूलच्या अमीराकडे आणि कोट कांगडा[1]-मंडीचा राजा संसारचंद्र यांच्याकडे जाण्यास देखील आपले वकील तेथूनच बाहेर पडले.

---

१ कोट-कांगडा (Kangra):—कांगडा आणि मंडी संस्थाने सतलज आणि व्यास गंगेच्या दोआबात आहेत; येथील ऐश्वर्यसंपन्न हिंदू देवालये फार प्राचीन कालापासून प्रसिद्ध आहेत. येथील प्रसिद्ध किल्ला कोणी आणि केव्हां बांधला हें अज्ञात आहे. खि. शक १००९ त गिझनीच्या महंमुदाने येथील देवळे लुटून मूर्ती फोडल्या. फिरोज तघलकानें खि. शक १३६० त देऊळ लुटले, आणि मूर्ति पायदळीं तुडविण्यासाठीं मक्केच्या मार्गांत टाकली. अकबराने खि. शक १५५६ त कोट-कांगडा घेतला. खि. शक १६२० त राजपुत्र खुर्रम (शहाजहान) यानें तेथील राजपुत्रांना दिल्लीस ओलीस म्हणून ठेविले. शीख सरदार जयचंद यानें खि. शक १७७४ त कोट-कांगडा घेतला; पण तेथील खरा वारसदार संसारचंद्र यानें खि. शक १७८५ त कोट-कांगडा हस्तगत केला; लवकरच संसारचंद्र स्वपराक्रमानें तेथील सर्वसत्ताधारी झाला; खि. शक १८०३–०४ मध्यें रणजीतसिंहानें संसारचंद्राला पायबंद घातला. खि. कश १८०५ डिसेंबरात यशवंतरावाचे वकील संसारचंद्राला भेटले. १८०६ त कोट-कांगडा राज्यावर गुरख्यांची स्वारी; रणजीतसिंहाने संसारचंद्रास सहाय्य करून गुरख्यांना

हरनाथदादा:—कोट कांगडा-मंडीचा राजा संसारचंद्र आपणास प्रतिकूळ होईल अशी फार भिती वाटते; पण भाऊराव चिटणासांनीं आपलें नांव राजा रणजीतसिंहाच्या दरबारांत राखलें किंवा कसें ?

पांडुतात्या:—मालरकोटल्याहून निघून आम्ही शतद्रुगंगा फिरोजपुराजवळ उतरलों; आणि तसेच सरळ अमृतसरास जाऊन पोहोंचलों.

खि. शक १८०९ मध्ये पिटाळले. कोट-कांगड्याचा किल्ला आणि त्याच्या संरक्षणार्थ सहासष्ट खेडी रणजीतसिंहानें आपल्याकडे ठेविली. निसटून पळालेला अप्पासाहेब भोसला—नागपूरकर संसारचंद्राच्या राज्यात खि. शक १८१९—२३ पावेतो दडला होता. खि. शक १८२४ त संसारचंद्राच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा अनिरुद्ध गादीवर बसला. रणजीतसिंहानें आपला दिवाण ध्यानसिंग याच्याकरितां अनिरुद्धाच्या मुलीची मागणी केली. खिं. शक १८२८ त आनिरुद्ध पळाला आणि हरिद्वारात जाऊन दडला. शीख-इंग्रज युद्धानंतर इंग्रजी निशाण कोट-कांगड्यावर फडकले. खिं. शक १९०५ त झालेल्या धरणीकंपानें कोट-कागडा उध्वस्त झाला.

१ फिरोजपूरः—अहमदशहा अब्दाली याच्या स्वाऱ्यानंतर खि. शक १७६३ त भंगी मिसलचा पुढारी गुजरसिंग यानें फिरोजपूर जिंकले. त्याचा पुतण्या गुरुबक्षसिंह याने फिरोजपूरचा किल्ला बांधला; मृत्यूसमयीं गुरुबक्षसिंहानें आपल्या मुलाच्या वाटण्या केल्या; तेव्हां त्याचा दुसरा मुलगा धन्नासिंग याच्या हातीं खि. शक १७९२ त फिरोजपूरचा किल्ला आला. रणजीतसिंहाच्या भयानें खि. शक १८०३ त

ग्यानबा:—आपणास देखील जर शतद्रु-गंगा ओलांडावयाची होती तर आपण फिरोजपूरच्या घाटानें कां गेलों नाहीं ?

हरनाथदादा:—राजा रणजीतसिंहाने महाराजांना भेटीसाठीं बोलावणें पाठविलें ही गोष्ट खरी आहे; पण ससैन्य येण्यास बोलावणें नव्हतें. सैन्याला शतद्रु-गंगेच्या पार जाऊं देण्यास शीख सैन्याचा अडथळा येण्याचाच संभव जास्त होता.

ग्यानबा:—आतां लक्ष्यांत आलें; महाराजांचा कयास चुकीचा नव्हता. म्हणून रायकोटपासून ईशान्य दिशेच्या रोखानें शतद्रु-गंगेच्या कांठाकांठानें त्याच नदीचा उतार-घाट धुंडाळीत फिरत असतां, इंग्रजी पलटणींनीं आम्हाला गांठण्याची निकड चालविली. उतार-घाटाचा शोध लावणारास बक्षिसें जाहीर झालीं. पण महाराजांचे दैव सबळ! सरते शेवटीं पलीकडच्या कांठीं असलेल्या फिलोर[1] किल्ल्यासमोरील नांवघाटाजवळ

धन्नासिंगाने इंग्रजांचे सहाय्य पत्करले. Cis-Sutlaj-States मधील संस्थानिकामध्यें इंग्रजांचे सहाय्य घेणारा धन्नासिंह पहिला होता. खि. शक १८०८ त रणजीतसिंह सतलज उतरला. धन्नासिंग खि. शक १८१८ त मरण पावला; तो निपुत्रिक असल्याने खि. शक १८३५ पावेतों त्याच्या विधवेने राज्य केले. पुढे ठरावाप्रमाणें फिरोजपूर इंग्रजांच्या हातीं आले; तेव्हापासून शीख सत्तेवर दाब ठेवण्यास फिरोजपूर इंग्रजी लष्करी ठाणे झाले. खि. शक १८३९ त सर हेनरी लारेन्सची फिरोजपुरात नेमणूक झाली.

१ फिलोरः—हा किल्ला सतलज नदीच्या काठीं उत्तर तटावर बांधलेला आहे. रणजीतसिंहानें या किल्याची डागडुजी केली.

आम्ही जाऊन पोहोंचलों तोंच शीखांच्या प्रतिकाराचा प्रत्यय अनुभवास आला. फिलोर किल्ल्यांतून तोफांचा भडिमार करून शीख-सैन्यानें गोळीबारास आरंभ केला; त्यांनीं सर्व नावा पलीकडच्या तीरावर अडकवून ठेविल्या होत्या; या योगानें सर्व जण धीर खचल्यामुळें अधीर होऊन सैन्यांत एकच गोंधळ उडाला. दादा, आपणास तो दिवस आठवतो ना ?

हरनाथदादाः—आठवतो असें कसें विचारतोस ? तो प्रसंग मी विसरणें केव्हांच शक्य नाहीं. फिलोर किल्ल्यापासून दीड दोन कोस प्रवाहाच्या खालीं मध्यंतरी एक मोठें बेट असल्याची बातमी आमच्या बरोबर असणाऱ्या एका मराठी शिलेदारानें आणली. बातमी ऐकतांच बेटांत तोफा त्वरेनें चढविण्यासाठीं मला महाराजांची आज्ञा झाली. धावपळ करून बेट गांठलें. पण चमत्कार असा कीं, त्या ठिकाणीं प्रवाहाचें पाणी फक्त दीड-दोन हातच खोल होतें. तोफा बेटांत नेऊन फिलोर किल्ल्याच्या रोखानें बसवितांच शीख सैन्यावर प्रभाव पड़ला. शतद्रु-गंगेने महाराजास जणूं वाट दिली असेंच सर्वजण समजलें. मार्तंडाच्या कृपेनें सर्व सैन्य पार उतरून पलीकडे गेलें. शीखांचा

फिलोर लुधियाना शहराजवळ असून येथेंच सतलज नदीवर खि. श. १८७० त आगगाडीचा पूल बांधला.

सरदार फत्तेसिंग[1] अहुलियावाला महाराजांच्या भेटीस आला. संशयाचे ढग पार वितळून गेले. तेथून कूच करून कपूरथळ्याच्या मार्गानें आज आम्ही व्यास-गंगेच्या कांठीं सुखरूप येऊन पोहोंचलो आहोंत. पण पांडुतात्या, राजा रणजितसिंहाला कार्यप्रवृत्त करण्यांत भाऊरावांना यश लाभलें किंवा नाहीं ?

पांडुतात्या:—यश लाभलें आणि लाभलेंही पण नाहीं.

ग्यानबा:—तात्या, अशी चिटणिशी भाषा नको. होय किंवा नाहीं तें स्पष्ट सांगा !

पांडुतात्या:—मुसलमानांच्या आक्रमक धोरणाशीं सतत झगडून आपल्या धर्मध्वजाची पताका शीखांनीं अमृतसरांत फडकविल्याचें उघड दिसतें. याचें प्रत्यंतर अमृतसरांत जागजागीं पाहात असतां मनुष्य दिपून जातो. शहर विस्तीर्ण. गुरु[2] अमरसिंगानें तेथें मोठा सागर निर्माण करुन आपलें नांव अमर केलें. त्याच तलावाचें अर्धवट उरलेलें काम गुरु रामदासानें पूर्ण करून

१ फत्तेसिंग अहुलियावाला:—Ahlu अहलु हे गांव बारी दोआबात आहे. बिआस आणि रावी नद्यांच्या मधल्या प्रदेशाला बारी दोआब म्हणतात; अहुलियावाला मिसलचा प्रदेश कपुर्थळ्याजवळ आणि कांहीं Cis-Sutlaj-States मध्यें होता. अहुलियावाल्या मिसलचा पुढारी फत्तेसिंग होता. फत्तेसिंगाचें रणजीतसिंहाशी नाते होते.

२ शं. पु. जोशीकृत "शीखांचा स्फूर्तिदायक इतिहास" पहा.

मधल्या बेटावर सुवर्ण मंदीर उभारलें. गुरु हरगोविंद यांचे स्मरणार्थ गुरु बाबा अटल यांनीं अमृतसरांत एक टोलेजंग मनोरा उभारला. तो मनोरा एकाद्या उत्तुंग गिरीशिखराप्रमाणें उभा असलेला दिसतो. अनेक उलाढालीनंतर अमृतसर हें राजा रणजीतसिंहाच्या हातांत आलें. आपल्या पवित्र धर्मक्षेत्राचें रक्षणार्थ तेथें त्यानें गोविंदगडाची उभारणी केली. या दुर्गाच्या तटबंदीच्या बांधणीनें शहराच्या सौंदर्यांत भर पडून संरक्षणाची काळजी कमी झाली.

ग्यानबाः—अमृतसरच्या वर्णनावरून शहर चांगलेंच मातब्बर दिसतें.

पांडुतात्याः—यांत काय संशय ? पण असें जरी असलें तरी भाऊरावांचें चित्त सदा सर्वदा स्वामिकार्यांतच मग्न असे. राजा रणजितसिंहाची भेट घेऊन आणि परस्परांचें बोलणें होऊन विचारविनिमय झाला. परस्परांनीं खिलत[1] नजराणे दिले घेतले. तीन चार दिवस फुकट लोटले तरी देखील निश्चयात्मक बोलणीं बोलण्यास पुरेसा अवसरच सांपडला नाहीं. कार्य यशस्वीपणें आणि निकडीनें साधून परत येण्यासाठीं भाऊरावांच्या पाठीमागें महाराजांचा सारखा तगादा लागला होता. कार्य

---

१ खिलतः—राजे लोक भेटीच्या वेळी परस्परांस बहुमानदर्शक पोशाख व जवाहीर वगैरे देतात घेतात; याला "खिलत-नजराणा" म्हणतात.

साधण्यास दिवसगत लागले तर प्राणसंकटाचें भय दत्त म्हणून पुढें उभें होतें. इकडे शीख दरबारचा ठाम निश्चय समजेना. शेवटीं एकदा सोक्षमोक्ष करण्याच्या हेतूनें शीख सरदारांच्या दिवाणीआम[1]मध्यें बोलण्याचा प्रसंग भाऊरावांनीं साधला. राजा रणजीतसिंह आपल्या सर्व मांडलिक शीख सरदारांसह खालसा दरबारांत बसला असतांना भाऊरावांनीं गर्जना करून आपलें म्हणणें त्यांच्यासमोर मांडलें. "श्रीगुरू नानकापासून तों तहत श्रीगुरु गोविंदसिंह, वीर-बंदा वगैरे सर्व धर्मवीरांनीं आपल्या हौतात्म्यानें जगाचे डोळे दिपविले ! सूर्यचंद्र आहेत तों पावेतों सदैव तळपणारें तें तेज सूर्यकिरणाप्रमाणें हिंदू जीवाला आजही मार्गदर्शक होत आहे. त्याच गोरक्षकांचे वंशज तुम्हींच ना ? जलचरांच्या फौजा पाठीस लागल्यानें त्यांना भिऊन, याचना करीत आम्ही आपल्या दाराशीं आलों आहोत, असला खोटा आभास उद्भवणाऱ्या भ्रमाला आपल्या अंतःकरणांत थारा देऊं नका. आमच्या शत्रूशीं आमचें आम्ही एकाकी झुंझण्यास पूर्णपणें समर्थ आहोंत, ही गोष्ट मागील दीड वर्षांच्या अनुभवानें आमच्या शत्रूंना देखील मान्य करणें भाग आहे. आज फक्त घरांतली दुफळी मोडून आम्हाला आमच्या घरांत सुखानें आणि शांतीपूर्वक नांदतां यावें एवढीच आमची अभिलाषा आहे. तुम्ही स्वतःला हिंदू हिताचे रक्षणकर्ते म्हणून म्हणविता. येवढ्या-

१ दिवाणी-आमः—उघड दरबार.

साठीं जलचराशीं आपणा उभयतांच्या संगनमतानें तह अथवा युद्ध व्हावें हीच आमची मागणी ! या महत्कार्यासाठीं श्रीमंत महाराज यशवंतराव होळकर यांच्या वतीनें त्यांचा चरणदास आपणासमोर उभा आहे. "

हरनाथदादाः—वाहवा ! वाहवा ! यावर शीख दरबारचें काय म्हणणें पडलें ?

पांडुतात्याः—लाभालाभाच्या कुशंकांना उत्तर देतांना शीख दरबारला स्पष्टपणें समजाविलें कीं, इंग्रजाविरुद्ध लढण्या-साठीं आमच्याशीं सामील झाल्यास, वीस लक्ष रुपयांची हमी पटविण्याची भाऊरावांनीं त्यांची खात्री करून दिली. या योगानें शीख दरबार मुग्ध होऊन सचिंत झाला ! त्यांनीं जरी अद्याप आपलें निश्चित मत दिलें नसलें तरी त्यांनीं नकार दिला नाहीं. महाराजास भेटून आणखी कांहीं स्पष्टोक्ति करण्यासाठीं भाऊरावांनीं मला परत इकडे पाठविलें. (पडद्यांत शिंग वाजतें.) अरे ! हें काय ?

हरनाथदादाः—महाराज स्नान आटोपून परत आले; आतां श्रीमार्तंडाचें दर्शन घेऊन महाराज अमृतसराकडे जाण्यास निघणार. चला, आपणही तिकडेंच जाऊं !

पांडुतात्याः—बरें झालें, मी अगदीं योग्य वेळीं भेट-ण्यास येथें आलों.

(सर्वजण जातात.)

स्थळः—व्यासघाट, गोविंदभट मार्तंडाची आरती करीत आहे.

जयदेव जयदेव जय श्रीमार्तंडा हो स्वामी मार्तंडा ॥
यशवंता यश देई उभवुनि कोदंडा ॥ जयदेव० ॥
दुफळीनें फाळोनी विच्छिन्न केलें ॥
अविंधांनीं छळिलें घालोनी घाले ॥
स्वकीय[1] सारे सांडुनि स्वस्थ गृहीं बसले ॥
देशद्रोही तितुकें अरि-पक्षीं फसले ॥ जयदेव० ॥१॥
आतां संकट समयीं प्रगटे मार्तंडा ॥
यशवंताचा राखी विजयि ध्वजबांडा[2] ॥
मणि-मल्लासुर मर्दुनि उभविले[3] दंडा ॥
बाणाईनें केला विजयी तव खांडा[4] ॥जयदेव०॥२॥
शोभति अश्वारूढा म्हाळसा-बाणाई[5] ॥
घेई गिरिजा अंकीं शिरिं गंगामाई ॥
शंकर साजे तैसा शोभसि प्रभु तूंही ॥
सुत हा पुंडरिकाचा रतला तव पायीं ॥जयदेव०॥३॥

---

१ स्वकीयः—शिंदा, भोसला आणि पेशवा.

२ विजयीध्वज—बांडाः—मल्हारजी होळकर पहिल्याने बांडे सरदाराच्या पदरीं होते. यासाठीं बांडे सरदारांचें पांढरे आणि लाल रंगाचे निशाण होळकरांनीं स्वीकारले; म्हणून होळकरांच्या विजयी ध्वजाला " बांडा निशाण " म्हणतात.

३ उभविले दंडाः—उभविले=यश वाढविले; दंडा=भाला.

४ खांडाः—जाडपात्याची—रूंद—दुधारी तलवार.

५ म्हाळसा—बाणाईः—ही नांवे श्रीमार्तंडाच्या स्त्रियांची होत.

यशवंतराव:—[आरती ओवाळून] कोण ? पांडुतात्या ?

पांडुतात्या:—[पुढें होऊन] जी सरकार, चाकर आज्ञेसाठीं उभा आहे.

यशवंतराव:—चिटणासाकडील बातमी आणून तुह्मी आमचा उत्साह द्विगुणित केला. ताम्राशीं झुंजण्यासाठीं उतावीळ झालेल्या आमच्या मराठी वीरांना, प्रसंग अगदी समीप ठाकल्यानें आतां हायसे वाटेल.

पांडुतात्या:—खरं आहे सरकार !

यशवंतराव:—अमृतसराहून याचवेळीं तुम्हाला येथें श्रीमार्तंडानेच आणले असें आह्मी समजतो. आमच्या डोक्यावर श्री मार्तंडाचें कृपाछत्र असल्यावर आह्मी कलिकाळाला देखील डगमगणार नाहीं. हरनाथ ?

हरनाथदादा:—आज्ञा सरकार.

यशवंतराव:—आमच्या निघण्याची तयारी झाली कां ?

हरनाथदादा:—होय सरकार. श्री मार्तंडाचा तीर्थप्रसाद ग्रहण केल्यावर अमृतसराकडे जाण्यास निघावयाचेंच.

(तीर्थप्रसाद वाटतात.)

प्रवेश दुसरा

स्थळ:—अमृतसर जवळील सरायबाग.

गोविंदभट:—व्यास-घाट सोडून पुरते तीन दिवस देखील उलटले नाहींत तोंच या येवढ्याशा अल्पकालांत किती तरी महत्वाच्या भानगडी आणि उलाढाली घडून आल्या. आतां मात्र लढाई एक दोन दिवसांतच जुंपणार ! युद्ध गडगडणार यांत संशयाला मुळींच जागा नाहीं. कसेंही असो. म्हाळसाकांताच्या कृपेनें एकदाचा सोक्षमोक्ष झाला म्हणजे मिळविली. अरे, पण हें काय ? महाराजापाशी चिटणीस खलबत करीत बसले असतांना त्यांना तेथेंच सोडून मी इकडे आलों; आणि इतक्या-तच माझ्या मागोमाग चिटणीस चिंतामग्न अवस्थेंत इकडेच येत आहेत. कांहीं अनपेक्षित असें घडलें कीं काय ?

चिटणीस:—[प्रवेशकरून] असला निराशेचा निरोप ऐकल्यावर कोण डगमगणार नाहीं ?

गोविंदभट:—म्हणजे आणखी कांहीं विशेष घडलें कीं काय ?

चिटणीस:—तसें विशेष कांहीं घडलें कीं, आमच्या महाराजांना संकटाशीं झुंजण्यासाठीं चेतनेची स्फूर्ति चढत असते ! रणजीतसिंहाच्या दरबारची गुळमुळीत आणि निराशा-जनक बातमी ऐकतांच एकाद्या लेच्यापेच्या माणसाची तर कंबरच खचली असती; पण आपल्या महाराजांचें सर्वच कांहीं

निराळें तंत्र आहे. त्यांना निराशेंत आशा दिसूं लागते! माझ्याशीं प्रश्नोत्तरें केल्यावर जेव्हां महाराजांनीं आपले पुढील बेत कोणत्या आधारावर उभारले आहेत तें मला समजावून सांगितलें, तेव्हां मी अगदीं थक्क झालों! आमचें बोलणें चालूं असतांना व्यास-घाटाहून ग्यानबा बातमी घेऊन आला. त्यानें आणलेल्या बातमीनें भलतीच खळबळ उडाली.

गोविंदभट:—म्हणजे? ग्यानबा व्यासघाटाहून केव्हां आला? कांहीं विशेष घडलें कीं काय? इंग्रजी पलटणी तर पतियाळाच्या राज्यांत होत्या.

चिटणीस:—इंग्रजी पलटणींनी व्यास-घाट[1] गाठला. आमचे सैन्य लागलीच पार झालें आणि व्यासगंगेच्या उतारां-तील मार्‍याच्या जागा अडवून बसलें. पांढर्‍यांचें पथक मात्र पूर्वेकडे कोट कांगडा-मंडी राज्याच्या सीमेवर आसपास जाऊन दडलें; या हालचाली पूर्वींच ठरवून ठेविल्या होत्या; हें मला माहीत असून देखील बातमी ऐकतांच मी गोंधळलों. महाराजांनीं मात्र समग्र बातमी शांत चित्तानें श्रवण केली; नंतर ग्यानबाला विश्रांतीसाठीं जाण्यास त्यांनीं आज्ञा दिली. कांहीं काल चिंतामग्न अवस्थेंत घालविल्यावर अमीरखानास बोलावण्यासाठीं महाराजांचीं मला आज्ञा झाली. अमीरखान आल्याची वर्दी येतांच मला

---

१ खि. शक १८०५ डिसेंबर दिनांक ८ ला इंग्रजी पलटणी व्यास घाटाजवळ पोहोचल्या.

महाराजांनीं जवळ बोलावून एका घटकेत सैन्याला कूच करण्यासाठीं सिद्ध ठेवण्यास मला आज्ञा झाली; तसेंच ग्यानबाचीही व्यवस्था पहाण्यास सांगितलें. इतक्यांत अमीरखान आंत आल्यानें मी बाहेर पडलों आणि सांगितलेल्या कामांची व्यवस्था केली.

(ग्यानबा प्रवेश करतो.)

गोविंदभट:—कांहो ग्यानबा ? इंग्रजी पलटणींनीं शतद्रू-गंगा कोणत्या घाटानें ओलांडली ?

ग्यानबा:—यांत कठीण असें कांहींच नव्हतें; इंग्रजी पलटणी आपल्या पाठीमागेंच फिरत होत्या; त्यांचा तळ आपल्यापासून सात आठ दिवसांच्या टप्प्यावर होता. शीखांचा सरदार फत्तेसिंग अहुलियावाला व्यास-घाटापाशीं इंग्रज सेनापती-जवळ अडून बसला आहे. अमृतसराहून येणाऱ्या वार्तेकडे तो डोळे लावून बसला आहे. पूर्वींच ठरवून दिलेल्या आज्ञेप्रमाणें टोपीवाल्यांच्या आगमनाची बातमी येतांच, आम्ही व्यास-गंगा उतरून पार गेलो आणि अमृतसरचा मार्ग अडवून धरला. इंग्रजी पलटणी जर व्यासगंगा ओलांडण्याच्या खटपटीस लागल्या तर लढाईला तोंड देणेंच भाग पडेल. परक्यांच्या प्रदेशांतून पुढें घुसून जाण्यास सैन्य आतां कचकचत आहे. म्हणून महाराजांच्या आज्ञेसाठीं मला पुढें तातडीनें पाठविलें. अरे! पण हें काय ?

गोविंदभट:—(आश्चर्यानें) म्हणजे ?

चिटणीसः— अरे वा ! महाराज आणि अमीरखान असे उभयतां रागारागानें आणि तावातावानें बोलत इकडेच आले !

गोविंदभटः— इकडे तिकडे सरकून जाण्यास देखील सवड नाहीं; आतां इथेंच बाजूस स्वस्थपणें उभे राहणेंच योग्य होईल.

(यशवंतराव आणि अमीरखांन बोलत प्रवेश करतात)

---

१ अमीरखानः—अमीरखानाचा आजा तल्यारखान Talehkhan रोहिलखंडाच्या नबाबाच्या आश्रयास आला. त्याच्या मुलाने—हयात-खानाने मुरादाबादेजवळ ईनाम जमीन मिळविली. अमीरखानाचा जन्म खि. शक १७६८ त झाला. त्याने पेंढाऱ्यांचें भाडोत्री सैन्य गोळा केलें. खि. शक १७९८ त अमीरखान आणि यशवंतराव एकत्र झाले. सिरोंज- टोक आणि पिडावा महाल त्याच्या सैन्य खर्चासाठीं खि. शक १८०६ त लावून दिले होते. नींबाहेडा महाल त्याच्याकडे खि. शक १८०९ पासून होता. छाबडा (Chhabra) महाल अमीरखानाला खि. शक १८१६ त मिळाला. अमीरखानाजवळ फारच मोठें व उत्तम घोडदळ असून पायदळाच्या छप्पन तुकड्या होत्या. त्याच्याजवळ हलक्या-भारी वजनाच्या तोफांचा संग्रह फारच मोठा होता. खि. शक १८१७ नोव्हेंबरात त्याच्या फितुरीसाठीं आणि त्याची शस्त्रास्त्रे हस्तगत करण्यास इंग्रजांची बरीचशी मोठी रकम खर्ची पडली. खि. शक १८१७ डिसेंबर दिनांक २१ ला झालेल्या महत्पुरच्या लढाईत अमीरखानाने टाळा दिला. मंदोसरच्या तहापासून टोंक Tonk संस्थान निर्माण झाले. अमीरखान टोंकचा पहिला नबाब झाला. अमीरखान खि. शक १८३४ त मरण पावला.

यशवंतराव:—तुमचे संतान शेवटी मिठास न जागले तर नवल नव्हे! पण लक्ष्यांत असूं दे! आमच्याशीं गांठ आहे.

अमीरखान:—सरकार!

यशवंतराव:—याच्यापुढें आम्हाला तुझा एक शब्द देखील ऐकून घेण्याची इच्छा नाहीं. आमच्या दृष्टीसमोर तूं एक क्षणभर देखील उभा राहूं नकोस. चल जा; आपले काळें तोंड घेऊन येथून निघून जा!

अमीरखान:—आमच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबाचें धारणपोषण आम्ही कसें करावें? आणि असल्या रडकथा आम्ही कुणाला सांगाव्या?

यशवंतराव:—आम्ही आमचें सर्वस्व देऊन देखील तूं तुझ्या जातीवर जाण्यास केव्हांही चुकणार नाहींस. एकादे प्रसंगी अशक्य वाटणारी गोष्ट देखील शक्यतेच्या कोटींत बसणें शक्य होईल; पण तुझ्यासारख्या घातक्याच्या फितुरीविषयीं लिहून ठेविलेलें ब्रह्मलिखित खोटें ठरविणें अगदींच असंभवनीय आहे! हें तुझें भविष्य आम्हाला स्पष्ट दिसत आहे. आणीबाणीच्या प्रसंगीं तुझ्यासारख्याच्या सहाय्यावर विसंबून राहणारा माणूस खळग्यांत पडणार, असें समजण्यास मुळींच हरकत नाहीं. चल नीघ; तुझें काळें तोंड आमच्या दृष्टीसमोर नसलेलें बरें!

अमीरखान:—सरकार!

यशवंतराव:—तुझ्या वायफळ बडबडीचा आम्हाला कंटाळा आला; आम्ही कर्तृत्वाचे भोक्ते आहोंत ! आतां याच्या-पुढें तुझा एक शब्द देखील ऐकण्याची आमची इच्छा नाहीं. या ठिकाणीं तूं आतां एक क्षणभर देखील उभा राहूं नकोस ! चल नीघ; येथून चालता हो.

अमीरखान:—आज्ञा सरकार ? (जातो)

यशवंतराव:—कोण, चिटणीस ?

चिटणीस:—[पुढें होऊन] आज्ञा सरकार.

यशवंतराव:—सैन्य केव्हां निघणार ?

चिटणीस:—एक घटकेच्या आंत सैन्य व्यासघाटाकडे परत जाण्यास निघणार.

यशवंतराव:—सैन्याच्या हालचाली ठरविल्या आहेत त्याप्रमाणें व्यवस्था करण्यास हरनाथला समजेल, असेंच पत्र लिहून बरोबर दिलें आहेस ना ?

चिटणीस:—होय सरकार.

यशवंतराव:—ग्यानबा ! सैन्याबरोबर हळूहळू चालीनें न चालतां तूं असाच तांतडीनें परत हरनाथकडे पुढें जा. व्यास-गंगा उतरण्यासाठीं यदाकदाचित् जर जलचरांनीं लगट केली, तर होतां होईल तेथपावेतों प्रत्यक्ष लढाईचा प्रसंग पुढें ढकलीत जा. पण शत्रूच्या पाटींत बडगा हाणण्यांत मात्र मुळींच मागेपुढें पाहूं नका. होतां होईल तो उदईक आम्हीं तेथेंच

आहोंत असे निश्चित समजण्यास हरकत नाहीं. जलचरांनीं जर हल्ला चढविला तर त्यांच्या पिछाडीवर चालून जाण्यासाठीं पांढऱ्यांच्या पथकाला सूचना पाठविण्याविषयी झालेली हयगय आम्हाला खपणार नाहीं.

ग्यानबाः—आज्ञा सरकार. (जातो)

यशवंतरावः—गोविंदभटजी ?

गोविंदभटः—आज्ञा सरकार.

यशवंतरावः—अमीरखानाच्या गोटाकडे असेंच सरळ जाऊन खंडूला गुप्तपणें भेटा. जलचराकडील प्रेषित यदाकदाचित तिंकडे आला अथवा भलतीच भानगड उपस्थित झाली तर त्याची बातमी आमच्याकडे पाठविण्याला विलंब लावूं नका. या गोष्टी खंडूला नीटपणें समजावून सांगा. तसेंच सावधानतेनें वागत जा. तसेंच अमीरखान येथून केव्हां आणि कोणत्या दिशेकडे कूच करून गेला, ही बातमी आम्हाला आतांच समजली पाहिजे.

गोविंदभटः—आज्ञा सरकार. (जातो.)

यशवंतरावः—चिटणीस ?

चिटणीसः—आज्ञा सरकार.

यशवंतरावः—तुह्मास मघाशी सांगितल्याप्रमाणें अमृतसराकडे जाण्याची तयारी झाली किंवा नाहीं ?

चिटणीसः—सरकारच्या शरीर रक्षकांच्या खास तुकडीतली निवडक पंचवीस तीस माणसें सज्ज ठेविलीं आहेत.

तसेंच बाकीचे लोक आपण अमृतसराहून परत येईपावेतो याच जागी तळ देऊन बसणार आहेत.

यशवंतराव:—अमृतसरातील आपल्या हालचालीवर लक्ष्य ठेवण्यास त्यांना निक्षून सांगितलें आहे नां ?

चिटणीस:—होय सरकार. पण अमीरखानाचा कांहीं गुंताडा[1] नजरेस पडला कीं काय ?

यशवंतराव—तसें नव्हें. भवानीशंकर[2] बक्षीसारखी अगदीं आमच्या जवळचीं माणसें जलचराच्या[3] कृष्ण कारस्थानाला बळी पडलीं. भवानींशंकर बक्षी निदान कायस्थ तरी होता; पण हरनाथसारखा मराठा माणूस देखील शत्रूच्या कृष्ण-कांचनाला डीगच्या प्रकरणीं हपापल्याचें दृष्टीस पडलें; वेळींच सावरला नसता तर आम्ही मात्र जन्मापासून वाढविलेल्या सेवकाला सतत्चे मुकलों असतो ! अमीरखान तर बोलून चालून भाडोत्री.

---

१ यशवंतराव आणि अमीरखान यांचा खटका उडाला; ही अफवा इंग्रजी छावणींत पसरली होती.

२ भवानीशंकर बक्षी:—हा कायस्थ जातीचा माणूस यशवंतरावाच्या उदयकाळीं पुढें सरसावला; होळकर–इंग्रज युद्धांत दिल्लीच्या प्रसंगी बक्षी फितुर झाला; दिल्ली शहरातील त्याच्या वाड्याला " हरामखोराचा वाडा " म्हणतात असे समजते. पार्शी भाषेत लिहिलेल्या त्याच्या बखरीचे मराठी भाषांतर इतिहासकार कै. अ. ना. भागवत यांनीं " भवानीशंकरची रोजनिशी " या नांवाने प्रसिद्ध केले आहे.

३ जलचरः—इंग्रज (समुद्रावर वावरणारे)

तशात मुसलमान; यासाठी आगाऊ काळजी घेणेंच श्रेयस्कर ठरतें. याशिवाय अमीरखानाला गुप्तपणें आग्नेय दिशेला पुढें जाऊन व्यासगंगा उतरण्यास सांगितलें आहे; तेथून पुढें तो पांढऱ्यांच्या पथकाला साह्य करणार. यामुळें खानाच्या बातमीवर लक्ष्य पुरविण्यास खंड्स बजावून सांगण्यासाठीं आम्ही नुकतेंच गोविंदभटास सांगितलें. ही गोष्ट तुमच्या लक्ष्यांत आली नां ?

चिटणीसः—होय सरकार !

यशवंतरावः—कांहो भाऊराव ? सगळ्या शीख सरदारांची जूट तरी रणजितसिंहाभोंवतीं आहे नां ?

चिटणीसः—छे, छे ! शीखांच्या बारा मिसली[1] होत्या. मिसलचें नांव गांवाच्या नांवारून पडलेलें असावें. कारण रणजितसिंह स्वतःला सुकरचाकीयावाल्या मिसलचा पुढारी म्हणवितो. त्याची सासू सदा[2]-कंवर हिच्या सहाय्यानें त्याला लाहोर[3] काबीज करतां आलें. आपल्या सत्तेचा विस्तार वाढविण्यासाठीं संधी साधून बऱ्याचशा मिसलींचीं वतनें बलाढ्य झालेल्या या रणजीतसिंहानें गिळंकृत केलीं. आतां फक्त सात मिसली उरल्या आहेत; या पैकीं तीन मिसली त्याच्या पक्षांत असून उरलेल्या तीन मिसलींतले लोक त्याच्या हालचालीकडे

---

१ मिसलः—जमात.

२ हिचेच दुसरे नांव " राजकंवर " असेंही आहे.

३ खि. शक १७९९ त रणजीतसिंहाने लाहोर हस्तगत केलें.

साशंकतेनें पहात आहेत; या दुहीचा फायदा जलचरांनीं घेतला. रणजीतसिंहाला इंग्रजी पक्षाकडे झुकविण्यासाठीं झिंदचा भागसिंह[1] अमृतसर शहरांत आपल्यापुढें येऊन ठाणें

---

१ भागसिंहः—फुल राजाच्या वंशजांना "फुलकियन" म्हणतात. फुल राजाचा सुखचेन नातू होय. सुखचेन पराक्रमी होता. खि. शक १७५४ त मरण समयीं सुखचेन राजानें आपले राज्य आपल्या तिन्ही मुलामध्यें वाटले. दुसरा मुलगा गजपतसिंह फार महत्वाकांक्षी होता. खि. शक १७५५ त त्यानें झिंद जिंकले. खि. शक १७६३ च्या पुढें झिंद संस्थानच्या इतिहासाला प्रारंभ झाला. खि. शक १७६६ त गजपतसिंह झिंद राजधानीत राहू लागला. दिल्लीश्वराशीं तो सामोपचारानें वागत असे. खि. शक १७७२ त दिल्लीश्वरानें त्याला "राजा" ही पदवी दिली. खि. शक १७७५ त त्यानें झिंदचा किल्ला बांधला. पतियाळा-झिंद आणि इतर फुलकियन जमातींनी एकत्र होऊन मिरतवर स्वारी केली. गजपतसिंह शत्रूचा बंदीवान झाला; मोठा खंड भरून तो मोकळा झाला. खि. शक १७८९ त गजपतसिंह मरण पावला. गजपतसिंहाचे पुत्र भागसिंह आणि भूपसिंग पराक्रमी होते. इंग्रजाविरुद्ध झालेल्या कारस्थानापासून भागसिंह अलिप्त राहिला. म्हणून मराठ्याकडून मिळालेला गोहाणा Gohana इंग्रजांनीं त्याच्याकडेच राखला. रणजीतसिंहाची आई राज-कंवर ही राजा भागसिंहाची बहीण होय. अर्थात राजा भागसिंह रणजीतसिंहाचा मामा होय. होळकराच्या पाठीमागें लागलेल्या इंग्रजी पलटणीबरोबर तो व्यासघाटावर पोहचला. तेथून तो इंग्रजांची बाजू मांडण्यास रणजीतसिंहाच्या दरबारी गेला. या कामगिरीबद्दल इंग्रजांनीं त्याला बवाना Bawana दिले; बवाना

देऊन बसला आहे; भागसिंह रणजीतसिंहाचा मामा लागतो.

यशवंतराव:—आतां लक्ष्यांत आलें. आतां अमृतसराकडे जात असतां मार्गांतच विशेष गोष्टींचा खल करूं. [पडद्यांत रणशिंग वाजतें] व्यासघाटांकडे सैन्य कूच करून चाललें हें एकाअर्थीं फार चांगलें झालें. चला, आपण देखील अमृतसराकडे जाण्यास निघूं. [जातात]

स्थळ:—(अमृतसर; गोविंदगडांतील दिवाणखाना; रणजितसिंह आणि भागसिंह बोलत आहेत.)

भागसिंह:—इंग्रजांच्या शौर्यप्रतापाची कमान चढतीवर आहे. श्रीरंगपट्टणचा वाघ या नांवानें प्रसिद्धी पावलेला टिपू-

---

पानिपतच्या नैऋत्य दिशेस आहे. भागसिंह खि. शक १८१९ त मरण पावला.

१ टिपू:—म्हैसूर संस्थानच्या दुबळ्या हिंदुराजाला नामधारी करून हैदरअल्ली तेथील सत्ताधारी झाला. निजाम, मराठे आणि इंग्रज या त्रयींला तो पुरून उरला. हैदरअल्ली खि. शक १७८२ त मरण पावल्यानंतर त्याचा पुत्र टिपू सुलतान यानें राज्यसूत्रे हातांत घेतलीं. त्याच्या कडव्या धर्माभिमानाने हिंदु पक्षाची सहानुभुति त्याने गमावली. खि. शक १७९२ त झालेल्या संधीने इंग्रजांनीं त्याला सर्वस्वी चेपला होता. खि. शक १७९५ नंतर मराठी सरदारांत घोटाळे माजल्याने परकीय धोरणाकडे त्यांचे दुर्लक्ष्य झाले. खि. शक १७९६ त म्हैसूरचा नामधारी राजा मरण पावल्यानंतर त्याच्या जागी टिपूने दुसरी नेमणूक केली नाहीं. धर्मच्छलाने कहर झाला. त्याचा

सुलतान अतिशय बलाढ्य होता. पण इंग्रजापुढें तो दीन होऊन गेला. महादजीबाबा पाटील शिंदे यांनीं दिल्लीपतीला अंकित केल्यानें गर्वानें ताठरलेले मराठे सरदार भलत्याच वल्गना करीत होते. पण पाटीलबाबाला[१] काळानें ओढून नेतांच नऊ-वर्षांच्या आंत, धूर्तपणानें परिस्थिति टेहळणाऱ्या इंग्रजांनीं शिंद्याच्या पलटणींचा युद्धांत फन्ना उडविला. युद्धाच्या[२] सुरवातीपासून अवघ्या पांच महिन्यांच्या अवधींत इंग्रजांनीं शिंद्याला खडे चारले आणि लासवारीच्या[३] लढाईंत चारीमुंडे चीत केलें. पेशवा तर इंग्र-जांच्या दारांत जाऊन पूर्वींच बसला होता; आणि आपणाला आपल्या या अनिष्ट सेवकापासून मुक्त करण्याविषयीं इंग्रजांची त्यानें काकुळतीनें मनधरणी आरंभिली होती. पेशव्यांच्या या उद्दाम सेवकांना शासन करण्याच्या कामांत इंग्रजांना यश लाभलेलें स्पष्ट दिसत आहे. आतां फक्त होळकराची टूरटूर चाललेली दिसत

फायदा इग्रजांनी घेतला; खि. शक १७९९ त टिपू श्रीरंगपट्टणच्या वेढ्यात मारला गेला. अशा प्रकारे टिपूची सत्ता नामशेष झाली.

१ खि. शक १७९४ फेब्रुआरीत वानवडी पुणे येथें पाटील बाबा शिंदे मरण पावले.

२ शिंदा-भोसला विरुद्ध इंग्रज युद्धाचा आरंभ खि. श. १८०३ आगष्टात झाला. शिंदे-इंग्रज संधी याच वर्षी डिसेंबर दिनांक ३० ला झाला.

३ खि. शक १८०३ सप्टेंबर दिनांक २३ ला लासवारीची लढाई झाली.

आहे; पण होळकरात कितपत पाणी आहे तें स्पष्ट झालें आहे. इंग्रजी पलटणीसमोर रणमैदानांत तोंड देऊन आणि टिकाव धरून, होळकर आजपावेतों एकदां तरी उभा राहिला कां ?

रणजीतसिंहः—काकाजी ! आपण अतिशयोक्ति करीत आहांत; यशवंतराव होळकराच्या हालचालीकडे आम्ही सावधानतेनें सारखे टेहळीत आहोंत. त्याचा वकील म्हणजे प्रत्यक्ष बृहस्पति आहे ! आमची त्याची भेट झाली असल्यानें, आम्हाला तुमचें म्हणणें कसें पटावें ?

भागसिंहः—त्याच्या वकीलाची जी येवढी प्रतिष्ठा आपण मिरवीत आहांत ती मला मुळींच पटत नाहीं. कारण शांतीसाम्राज्याचा पुरस्कार करणाऱ्या इंग्रजांचा आपणाला मुळींच अनुभव नाहीं; आणि अशा अवस्थेंत आपण ही तुलना चालविली आहे ती मी कशी मान्य करूं ? दिल्ली शहराचें रक्षण करीत असतांना इंग्रज ठाणेश्वरच्या अगदीं निकट येऊन पोहचले; यामुळें आमच्याशीं त्यांचा संघर्ष वाढला; आपल्या मित्रांच्या हिताहिताविषयीं ते किती धोरणी असतात ही गोष्ट आम्ही ओळखतो.

रणजीतसिंहः—इंग्रज कितीही उपयोगी पडला तरी तो गोभक्षक असल्यानें आमच्या धर्मबांधवांना योग्य कारणाशिवाय त्याच्याशीं सलगी करणें परवडत नाहीं. या गोष्टीला आमचा उपाय नाहीं, याला आम्ही काय करावें ?

(भालदार प्रवेश करतो)

भालदारः—महाराजाधिराज, होळकरांचा वकील बाहेर भेटीसाठीं. उभा आहे.

रणजीतसिंहः—काकाजी ! आपण थोडावेळ दरबारात जाऊन बसा. मी तिकडे लौकरच येतो.

भागसिंहः—बरें आहे; मी तिकडे जाऊन बसतो. (जातो.)

रणजीतसिंहः—[भालदारास उद्देशून] जा ! होळकराच्या वकीलाला आंत येऊं दे.

चिटणीसः—[प्रवेश करून] रणजीतसिंह महाराजांचा सदासर्वदा विजय असो ! महाराजाकरितां आनंदाची बातमी आणली आहे. महाराजांच्या भेटीसाठीं माझ्या स्वामीला—माझ्या अन्नदात्याला—येथें बरोबर घेऊन उपस्थित झालों आहे.

रणजीतसिंहः—वकीलसाहेब ? काय म्हणतां ? यशवंतराव होळकर आपलें सर्व सैन्य बरोबर घेऊन भेटीसाठी आमच्या राजधानींत आले आहेत ?

चिटणीसः—तसें नव्हे; माझे स्वामी सड्यास्वारीनें आपल्या भेटीसाठी मार्गांत उभे आहेत.

रणजीतसिंहः—कांहो वकील साहेब ? आपण म्हणतां ही गोष्ट खरी आहे काय ?

चिटणीसः—हातांतलीं काकणें पाहण्यासाठीं आरश्याची आवश्यकता नसते. समोरच्या खिडकींतून आपण मार्गाकडे

पाहिल्यास उभयतांची दृष्टिभेट होईल. (खिडकींतून यशवंतरावा-कडे बोट दाखवितो.)

रणजीतसिंहः—या बातमीनें मी भ्रमांत पडलों. पण वकीलसाहेब ? भलतेंच कांहीं सांगून आणि माझा बुद्धिभेद करून आपण माझी फसवणूक तर करीत नाहीं ना ?

चिटणीसः—छे, छे ! भलतंच कांहीं तरी महाराजांच्या मनांत आलें आहे. महाराजाविरुद्ध असला अक्षम्य अपराध माझ्या हातून कसा घडेल ? माझ्या स्वामीला आपल्या समोर दरबारांत आणण्याची अनुज्ञा मिळाल्यास शंकेचें निरसन एका क्षणांत होईल.

रणजीतसिंहः—जा, त्यांना वर लवकर घेऊन या. त्यांना मार्गांत खोळंबविणें केव्हांही अनुचित दिसेल.

(चिटणीस जातात.)

रणजीतसिंहः—[स्वगत] होळकरांच्या एकेक गोष्टी ऐकाव्यात तर नवल वाटतें. आज त्याच्या या एकाकी येण्याच्या धाडसानें तर कळस झाला ! पण मला फसविण्याची तर ही युक्ति नसेल ना ? छे, छे ! या सिंहाच्या गुहेंत-माझ्या राजधानींत-या गोविंदगडांत तसलं कांहीं करण्याचें धाडस करणें परक्याला फारच अवघड आहे. माझ्याप्रमाणेंच होळकर देखील एका डोळ्यानें दुखावलेला[१] आहे असें मी ऐकलें आहे. अरे वाः !

---

१ यशवंतरावाचा उजवा डोळा दुखावला, ती जागा बडगुंदा गांवाजवळ आहे; ती जागा " हठीला भैरू—हट्टी भैरव " या

उभयतां आलेच ! (यशवंतराव व चिटणीस येतात.)

चिटणीसः—उभयता सरकारांचा विजय असो !

(रणजीतसिंह आणि यशवंतराव भेटतात.)

रणजीतसिंहः—आपणाबरोबर आणखी किती लोक आहेत?

यशवंतरावः—आमच्या पंधरा वीस अनुचरासह गांवाबाहेर पाण्याची सोय पाहून आम्ही उतरलों आहोंत.

रणजीतसिंहः—आपल्या आगमनाची जर आम्हास पूर्वसूचना असती, तर आपल्या योग्यतेला साजेसा असा आदरसत्कार आम्हाला करतां आला असता.

यशवंतरावः—आपल्या हिंदी-बांधवानें अंतःकरणपूर्वक केलेल्या साध्या आदरातिथ्याला आम्ही सचोटीचा सत्कार समजतों. पांघरूणाखाली दडलेल्या विषारी वासनांनीं अंतःकरण बुजबुजलेलें असतांना स्वार्थ दृष्टीनें केलेल्या नाटकी आदरातिथ्यांत कमी अधिक असलें तरी तें चाणाक्ष माणसाला उमगणें कठीण नसतें.

रणजीतसिंहः—तसलें कांहीतरी भलत्याच मानभावीपणाचें लक्षण आपणास येथें आढळणार नाहीं. माझ्या

नांवानें प्रसिद्ध आहे. बडगुंदा गांव महूपासून चार कोस अंतरावर आहे. वि. कों. ओक यांच्या " हिंदुस्थान कथारस " पुस्तकात या संबंधी लिहिलेला मजकूर Princep's "Life of Amirkhan" वरून लिहिलेला असावा; पण मालकमच्या " Memoirs of Central India " पुस्तकात " यशवंतरावाचा डोळा दुखविल्यानें बडगुंद्याच्या छावणीचा मुक्काम वाढला. " असें स्पष्ट लिहिलें आहे.

गोविंदगडांत अगदीं साधेपणानें आणि आपलेपणा राखून घरीं चालून आलेल्या अतिथीचें आदरातिथ्य करण्यांत माझ्या आयुष्यांतील आजचा दिवस मी मोठा भाग्यवान समजतो ! बरं, तें असो ! आपण आतां मिसलकडे-खलबतखान्याकडे जात असतां पुढील कार्याची रूपरेषा ठरवूं. (जातात)

चिटणीस:—माझ्या स्वामीला—या मराठी सिंहाला आणि पंजाबच्या या रणजीतसिंहाला एकमेकाजवळ आणण्यांत मला यश लाभल्यानें मी स्वतःला धन्य समजतों ! आतां पाहूं सुव्यवस्थित रितीनें घडी कशी जमती; काय होईल तें लवकरच कळेल. (जातो).

स्थळ:—मिसल—खलबतखाना

(शिखांच्या ग्रंथराजासमोर दरबार भरला आहे.)

भागसिंह:—प्रस्तुत प्रसंगीं माझ्या धर्मबांधवांना समजुतीच्या चार गोष्टी सांगणें मी माझें आद्य कर्तव्य समजतों. अफगाणांशी सामना करण्याच्या निमित्तानें मराठी सरदारांनीं मागील पन्नास वर्षांत आपल्या राज्यांत धुमाकुळ माजवून सर्व प्रदेश उजाड पाडला ही गोष्ट सर्वश्रुत आहे. दिल्ली राजधानीला शह बसवून हळूहळू त्यांनीं पुढचें आक्रमण सुरूं ठेविलें, पण अहमदशहा अबदालीशीं कुरुक्षेत्रावर झडलेल्या रणसंग्रामांत मराठ्यांचें कंबरडें मोडलें. त्याच युद्धांत पाय गमावून लंगडशाही पदरीं आलेल्या महादजी-शिंदे पाटीलबाबा यांनीं आपलें सैन्य

टोपीवाल्या करवी शिस्तींत आणून आपला गमविलेला जम पुन्हां बसविला. शिखांचे लुटारू सरदार पृथु-तीर्थावर[2] स्नानाचें निमित्त करून आणि चोराप्रमाणें आमच्या सरहद्दींत शिरून आजपावेतों त्यांनीं आमची पद्धतशीरपणें लूट केली आहे. हांसीत घुसून बसलेला टोपीवाला थॉमस[3] हा मराठ्यापेक्षांही

१ फ्रेंच सेनापति पेरन वगैरे.

२ पृथु-तीर्थः—पिहोवा (Pehowa) म्हणजेच प्राचीन काळचे पृथु-तीर्थ होय. पिहोवा सरस्वती नदीचे काठीं असून ठाणेश्वर आणि कैथल यांच्या मध्यंतरी आहे. हें स्थान कैथलच्या राज्यांत आहे. वेन राजाचा मुलगा पृथुराज यानें प्रिथोदक तीर्थ बांधले. प्रिथुदकेश्वराचे मंदिर प्रसिद्ध आहे. सरस्वती आणि कार्तिक स्वामीच्या तेथील प्रतिमांची पूजा यात्रेकरू भाविकपणें करतो.

३ जार्ज थॅामसः—अठराव्या शतकाचे अखेरीस कित्येक पाश्चिमात्य सेनानायक भारतवर्षांत आले होते. त्यापैकीच जार्ज थॅामस हा एक होय. खि. शक. १७८३ च्या दुष्काळाने पंजाब प्रांत उजाड पडला. ही संधी साधून थॅामसनें खि. शक १७९० त हरयाणा प्रांत बळकावला. तेथील बारी आणि झज्जर Jhajjar गांवावर दाब ठेवण्यास जार्ज थॅामसने जार्जगड—जहाजगड बांधला. खि.शक १७९७-१८०२ पावेतों थॅामस तेथें सत्ताधारी होता. प्राचीन हांसी Hansi शहर उजाड पडले होते. खि. शक १७९८ त थॅामसनें आपला मुख्य तळ हांसीत ठेविला होता. शिंद्याचा फ्रेंच सरदार लुई बोरकिन Louis Bourquin यानें खि. शक १८०१ त जहाजगड हस्तगत केला. शिंद्याच्या पराजयानंतर हांसी येथें खि. शक १८०३ मध्यें इंग्रजांनी आपल्या देशी पलटणींचे ठाणें ठेविलें होतें.

वरचढ होऊन बसला होता. पण मागील दोन तीन वर्षांच्या अवधींत इंग्रज पुढें झाले; आणि त्यांनीं मराठ्यांना दिल्लीहून हुसकावून पार पिटाळून लाविलें; या त्यांच्या धाडसी पराक्रमानें आम्हाला त्यांनीं शांती मिळवून दिली. पण आतां पाहावें तो होळकरांची टोळधाड येऊन आम्हावर कोसळली आहे. हें संकट निवारण करण्यासाठीं आमच्या उपकारकर्त्या इंग्रजांना तन-मन-धनेंकरून सहाय्य करणें हें आमचें पवित्र कर्तव्य होय.

(रणजीतसिंह आणि यशवंतराव प्रवेश करतात. सर्वजण उभें राहतात. भालदार जयसूचक ललकाऱ्या देतात.)

रणजीतसिंह:—असे इकडून यावें आणि या आसनावर विराजमान व्हावें !

भागसिंह:—हे पहा, आपण शत्रूला उघडपणें उत्थापन देत आहांत. ही गोष्ट अगदीं अनुचित होय. याबद्दल इंग्रज वकिलाला काय वाटेल ?

रणजीतसिंह:—इंग्रज वकिलाला अवघड वाटेल म्हणून आम्हीं भ्यावें ? तशांत इंग्रज आज कांहीं आमच्या शत्रूपक्षांत नाहीं; आणि होळकर तर नाहींच नाहीं.

भागसिंह:—इंग्रजांच्या वकिलाचा असला सन्मान आपण केला नव्हता !

रणजीतसिंह:—काकाजी ! आपण आपल्या अधिकारांचें अतिक्रमण करीत आहांत. इंग्रजांचा वकील हा कितीही मोठा

असला तरी तो त्याच्या मालकाचा प्रतिनिधी होय; तो मालक नव्हे. होळकरासारख्या सत्ताधाऱ्याशीं त्याची तुलना करणें केव्हांही अनुचित ठरेल.

भागसिंहः—बरें आहे, आपणाला उचित वाटणारा धुमाकूळ असाच चालू द्या. पण लक्ष्यांत असूं द्या कीं, या विषयाचा जाब देतांना आपणाला जड जाईल.

रणजीतसिंहः—आम्हाला जाब विचारणारांचें दांत आम्ही त्याच्याच घशांत कोंबीत असतों. परिस्थितीशीं तोंड देऊन कसें झगडावें हें आम्हाला समजतें; आपल्यापावेतों न येतां असलीं प्रकरणें येथेंच जिरलीं तर आपणाला समाधान वाटेल नां ?

भागसिंहः—त्याचें आज कशाला बोलतां ? वेळ येतांच आपणही समजून जाल. (जातो.)

रणजीतसिंहः—आम्ही असल्या भेकडांची क्षिती मुळीच बाळगीत नाहीं.

कर्तारसिंगः—घडलेला प्रकार अशुभ चिन्ह दर्शक आहे, असें मला वाटतें.

रणजीतसिंहः—कांहीं झालें तरी अतिथी-सत्कार हा झालाच पाहिजे !

यशवंतरावः—सत्काराचें अवडंबर माजविण्यापेक्षां अंतःकरणपूर्वक खऱ्या प्रेमानें केलेल्या आगतस्वागतालाच आम्ही सचोटीचा सत्कार समजतों. बलात्कारानें करण्यास

लाविलेला "रामराम" पुढें मागें अपायकारक ठरून निस्तरावा लागतो.

रणजीतसिंह:—नुकत्याच घडलेल्या प्रकारामुळें आपलें अंतःकरण दुखविलें असेल हें आम्ही ओळखलें आहे; या प्रकारानें आमच्या विचारांत किती कालवाकालव झाली असेल याची जाणीव आपणास नसेल असें कसें होईल? यासाठीं आमच्याकडे पाहून आणि परिस्थितीं ओळखून आमच्या आदरातिथ्याचा स्वीकार व्हावा हेंच योग्य होईल.

यशवंतराव:—आदरातिथ्याचा सोहळा जितका झाला तितका पुरे झाला; असें नव्हे कां? बाह्योपचारचें प्रदर्शन करण्यापेक्षां, आपणापुढें ठेविलेल्या आमच्या कार्यक्रमाचें पालन करून, उभयतांच्या संगनमतानें या भरतभूमीच्या परदास्य मोचनार्थ शत्रू-विरूद्ध तोंड देणें, या कार्यालाच आम्ही खरा-खुरा आदरसत्कार समजतों.

रणजीतसिंह:—तें कसें काय होईल हें आतांच कसें सांगता येईल? त्या कार्याचे उत्तरदायित्व एकट्या आमच्यावर नसून तो भार खालसा दरबारच्या अखिल मंत्रीमंडळावर आहे. आपणाला खिलत नजराणे हे जरी बाह्योपचार वाटत असले तरी ते राजसत्तेचे निदर्शकच होत. यासाठीं माझ्या एकट्याच्या मनाला आनंदविण्याकरितां तरी आदरातिथ्याचा समारंभ होणेंच योग्य होईल.

(खिलत, नजराणा देण्याचा समारंभ होतो)

रणजीतसिंह:—खालसा दरबारात येऊन आणि आमचा पक्ष उचलून धरणाऱ्या सभासदांना आणि आमच्या शीख धर्म-बांधवांना होळकराची कैफियत त्यांच्या वकीलानें पूर्णपणें विशद करून सांगितली आहे. इंग्रजी पलटणी आज आपल्या घराच्या आंत चाल करून घुसून बसलेल्या आहेत. आपल्या राज्यांत युद्धाची धुमश्चक्री होऊ देणें हें आपल्याला केव्हांही अनिष्टच ठरेल. यांत आपले आमच्याशीं दुमत असूं शकत नाहीं; अशांत इंग्रजाविरूद्ध उघडपणें युद्धास तोंड देण्याचा निश्चय करून पुढें चाल करून जाण्यासाठीं होळकरांचा आग्रह आहे. युद्ध खर्चा-साठीं आपल्या मागणीप्रमाणें ठराविक द्रव्यसहाय्य पुरविण्याचें होळकरानें मान्य केलें आहे. आतां या विषयाचा सोक्षमोक्ष करणें हें खालसा दरबारच्या अखिल मंत्रीमंडळाचें काम आहे.

कर्तारसिंग:—दिसणाऱ्या परिस्थितीचें चित्र महाराजांनीं हुबेहुब रंगविलें आहे. इंग्रज आणि मराठे असे उभयतां भांडत-भांडत आमची कसल्याही प्रकारें मर्यादा न पाळतां आमच्या प्रदेशांत शिरल्यानें सर्व प्रदेश उध्वस्त झाला. "होळकराला घरांत दडवून आणि आश्रय देऊन आम्हाला सीमेच्या बाहेर निघून जाण्यास सांगाल तर ते आम्हास कसें मान्य व्हावें ?" इंग्रजी वकीलाच्या अशा विचारसरणीस आपण काय उत्तर द्यावें ? होळकरास साहाय्य नाकारून सीमेबाहेर जाण्यास सांगणें

म्हणजे शतद्रू आणि व्यासगंगा या नद्यांच्या दोआबांतच उभयतांमध्यें रणकंदन माजूं देण्यास सवड देणें होय; आणि हें जणू काय मुद्दामच घडवून आणले असा सर्व लोकांचा समज होईल.

यशवंतराव:—आमच्यामुळें आपण संकटांत सापडावें अशी आमची मुळींच इच्छा नाहीं. जलचराविरुद्ध आपली उठावणी करण्याच्या आमच्या हेतूमध्यें आपण फक्त आमच्या स्वार्थाचाच विचार केला असें आपल्या बोलण्यावरून उघड दिसतें; पण आम्हा मराठ्यांचा आणि कुंपणी सरकारचा परिचय चाळीस वर्षांपेक्षां ज्यास्त दिवसांचा आहे. एका हातांत न्यायाची तागडी धरून आणि दुसऱ्या हातांत धरलेंल्या नागव्या तरवारीनें भारतवर्षांतील दुभंगलेल्या आणि दुबळ्या सत्ताधीशांना या कावेबाज टोपीवाल्यानें फसवून दबविलें. ओसरीच्या आश्रयास बसूं दिलेल्या या परक्या पाहुण्यानें आपले हातपाय पसरून आश्रयदात्यालाच व्यापून टाकलें. पेंशवा, शिंदा आणि भोसला यांनीं स्वत: खर्च सोसून टोपीवाल्यांच्याच पलटणी आपल्या संरक्षणार्थ आपल्याच घरांत ठेवून घेतल्यानें त्यांनीं आपलें स्वतंत्र अस्तित्व त्याचवेळीं गमावलें. आपणास देखील हाच

१ पेशवा–इंग्रज वसईचा तह खि. शक १८०२ डिसेंबर ३१ दिनांकला झाला. भोसला–इंग्रज तह देवगांव येथें खि. शक १८०३ डिसेंबर दिनांक १७ ला झाला. शिंदा–इंग्रज तह सुर्जी-अंजनगांव येथें खि. शक १८०३ डिसेंबर दिनांक ३० ला झाला.

अनुभव यथावकाश समजून येईल. याकरितां वेळींच सावध होऊन भारतवर्षाच्या या परक्या शत्रूस देशाबाहेर हाकलून लावण्यास आपले मुत्सद्दी धोरण उपयोगी होईल; येवढाच हेतू उराशीं बाळगून इतक्या लांबच्या पल्ल्यावर जलचरांच्या पलटणींना चकवीत चकवीत आम्ही ससैन्य येथवर चालून आलों. आमच्यांत असलेल्या सामर्थ्याच्या जाणिवेनें आपल्यामध्यें चैतन्याच्या स्फूर्तीचा संचार व्हावा येवढ्या एकच हेतूनें आम्ही आज आपल्या समोर असे सशस्त्र उभे आहोंत. बोला ! आपल्या अंतःकरणांत आणखी कांहीं शंका कुशंका उद्भवल्या असल्यास त्यांना उघड उघड वाच्यता द्या ! या योगानें मत-भेदांची छाननी होऊन खरा निर्णय करण्यास सोयीचें होईल. काश्मीरपासून कन्याकुमारीपावेतों आणि सिंधु नदापासून ब्रह्मपुत्र नदापावेतों पसरलेल्या भारतवर्षालाच आपण आपली मायभूमी समजता नां ? तेव्हां आमच्या आर्यसंस्कृतीचा नायनाट करून तिच्या मानगुटीस बसूं पाहाणाऱ्या या परकीय आक्रमक संस्कृतीच्या मायावी धोरणाला भुलून आम्हाला एकनिष्ठपणें सशस्त्र सहाय्य करण्यास आपण डगमगणार किंवा कसें, याचें निर्भीडतेनें स्पष्ट उत्तर द्या.

(शिखांचा लढवय्या पक्ष वाहवा करून मान डोलावतो)

कर्तारसिंगः—होळकरानें पुढें ठेविलेल्या आर्थिक लोभावर दृष्टि ठेवून आणि त्यांना सशस्त्र सहाय्य करून आजच

टोपीवाल्याविरूद्ध भांडण विकत घेण्याचें आम्हाला योग्य कारण आढळत नाहीं. भविष्यकाळांतलीं भलतींच अनुमानें बांधून कसलेंच कारण नसतांना इंग्रजांशीं आजच युद्ध सुरूं करण्याचें कारण आम्हाला कसें पटावें ? जय-अपजय मिळणें ही गोष्ट सामर्थ्यापेक्षांही दैवाधीन आहे; असें असतांना आम्ही उगीचच भांडण उकरून काढण्याची कल्पना आम्हाला मुळींच पटत नाहीं.

(बरोबर ! बरोबर ! अगदीं खरें ! असें बोलून काहींजण मान डोलावतात.)

यशवंतराव:— आतां मात्र आम्हाला फक्त दोनच मार्ग शिल्लक उरले आहेत. आमच्या सामर्थ्याची चुणुक पटविण्यासाठीं शतद्रू आणि व्यासगंगेच्या दोआबात टोपीवाल्यावर हल्ला करून तुटून पडणें हाच आमचा पहिला मार्ग होय. याप्रसंगीं भलताच खेळ खेळून तटस्थतेच्या पावित्र्याचें विडंबन आपणाकडून न व्हावें यासाठीं आमची आपणास सविनय प्रार्थना आहे. या एकाकी लढण्यानें सामर्थ्याच्या बाबतींत आमच्या शत्रूपेक्षां आम्ही एक रतीभर देखील हिणकस ठरलों नाहीं म्हणजे पुरें आहे; येवढी गोष्ट जरी आम्हास पटवितां आली तरी तेवढ्यानें आम्ही पुष्कळच मिळविल्यासारखें होईल. आतां उरलेला दुसरा मार्ग अवलंबिण्यास लावणें न लावणें हें सर्वस्वी आपणावरच अवलंबून आहे; कारण आमचा पहिला उद्देश साधण्यांत जर आपण रोडे अडकविले तर उरलेला दुसरा मार्ग

स्वीकारण्यावांचून आम्हांला इतर गत्यंतर उरतच नाहीं. आपल्या वकीलांनीं आम्हाला भेटण्याचें आमंत्रण दिलें त्यावेळीं काबूलच्या अमीराचे हस्तकही आम्हाला घेऊन जाण्यासाठीं आमच्या छावणींत येऊन बसले होते; तेव्हांपासून ते देखील आमच्या स्वारीबरोबरच आहेत. काबूलचा[1] अमीर सरहद्दीपावेतों पुढें आल्याची बातमी आपणासही कदाचित समजली असण्याचा संभव आहे. आमच्या माय देशाच्या परदास्य मोचनासाठीं कसल्याही प्रकारचा स्वार्थ-त्याग करावा लागला तरी तो आम्हास पत्करेल. याहीपेक्षां ज्यास्त म्हणजे प्रसंग पडल्यास इस्लाम धर्माची दीक्षा पत्करून देखील अमीराच्या सहाय्यानें आणि सुचेल त्या उपायानें आमच्या मायभूमीतून–भारतवर्षांतून–टोपीवाल्यांचें उच्चाटण करण्यासाठीं आम्ही आतां कटिबद्ध झालेले आहोत.

(हे काय ? हे काय ? असले उद्गार उठतात.)

कर्तारसिंगः—वैदिक संस्कृतींत जन्म घेतलेल्या होळकरा-सारख्या नरवीराला असले उद्गार शोभत नाहींत.

यशवंतराव:—सर्व बाजूंनीं कोंडलेले सावज देखील मृत्यूला कवटाळीत असतांना पराकाष्ठेची धडपड करतें. त्याचप्रमाणें आम्ही तर सर्व बाजूंनीं स्वकीयांच्या सहाय्यास आधींच आंचवलेले आहोंत; म्हणून आपणासारख्या क्षात्रवृत्तीच्या वीरापुढें आपली कर्मकथा सांगून वैदिक संस्कृतीच्या रक्षणार्थ आपली

---

१ यावेळीं काबुलचा अमीर झमानशहा होता.

उठावणी करावी, येवढ्या एकाच हेतूनें येथें आम्ही ससैन्य आलों आहोत. समरपटु गुरुगोविंदसिंगाच्या स्मृतीनें महाराष्ट्राची आणि शीखांची मैत्री अभंग झाली आहे; पण येथें येऊन पहावें तो क्षात्रतेजानें रसरसलेले असतांही क्षुद्र स्वार्थापुढें आपले धर्मतेज आम्हाला लोपलेलें भासलें ! (असें नव्हे ! असें नव्हे ! असा गोंगाट होतो) साधनाभावीं आम्ही निराशेनें वेडावलेले आहोत; अशा प्रसंगी संस्कृतीला न शोभण्यासारखे क्षुद्र विचार आमच्या तोंडून बाहेर पडले यांत नवल नव्हे !

रणजीतसिंहः—परिस्थितीकडे दृष्टी ठेवून जरा सौम्यतेनें घ्याल तर सर्व कांहीं आपल्याच तंत्राप्रमाणें साधण्यास सुलभ होईल; आपले संकट आम्ही ओळखले आहे. युद्ध टाळून शांतता प्रस्थापित करण्यासाठीं टोपीवाल्याशीं समेट घडवून आणावा हीच आपली महत्वाकांक्षा आहे नां;

यशवंतरावः—तसें नव्हे; भारतवर्षांतून टोपीवाल्यांची हकालपट्टी करण्यासाठीं उभयतांच्या सामर्थ्याचा संयोग साधावा, येवढीच आमची खरी आणि कळकळीची महत्वाकांक्षा आहे.

रणजीतसिंहः—जरा सावधानतेनें आणि सावकाश घ्याल तर सर्व कांहीं साधेल. पहिल्यानें आपले वकील आमच्या वकीलाबरोबर इंग्रजांच्या सेनापतीला भेटून येऊं द्या; ही तडजोड ते घडवून आणतील अशी आमची खात्री आहे. ही गोष्ट न जमली तर मात्र आम्ही आपलें सर्व प्रकारें सहाय्य

करण्यास बांधलेले आहोत. आमच्या पूर्वजांनीं वंद्य मानिलेल्या श्रीसत् अकाल तख्तासमोर आणि आमच्या मिसलच्या धर्मबांधवा-समक्ष या गोष्टींचा उच्चार करून आम्ही आज आपल्याशीं वचनबद्ध होत आहोंत. आतां तरी आपली खात्री पटली किंवा नाहीं ?

यशवंतराव:—आपल्या या महत् उपकाराचें ओझें शिरसा-वंद्य मानून आम्ही आमच्या माळव प्रांतांतल्या राजधानीकडे शांततेंत पोहोंचूं. यांत शंकाकुशंकेला तिळप्राय वाव नाहीं; ही गोष्ट खरी आहे; तथापि आपण मात्र हें पूर्णपणें लक्ष्यांत असूं द्या कीं, हेळसांड करून असली सुवर्णसंधी गमावल्याबद्दल आप-णाला आपले पुत्र-प्रपौत्र शिव्याशापांची लाखोली वाहण्यास सहसा चुकणार नाहींत.

रणजीतसिंह:—ह्या इतर गोष्टी राहूं द्या. उद्याची कटकट आज कशाला ? आतां उरलेला वेळ आपण आमच्या सहवासांतच राहावें.

प्रवेश तिसरा.

स्थळ:—(व्यासघाट; इंग्रजी छावणी; होळकरांचे वकील प्रवेश करतात.)

पांडुतात्या:—बाळाराम शेटजी, आपण इकडे लक्ष्य द्या; हबिबउल्ला खानसाहेब आणि आपण अशा उभयतानीच आतां

पुढें होऊन स्वतःच प्रश्नोत्तरें केलीं पाहिजेत; आपणाबरोबर मी फक्त सल्लागार मंत्री या नात्यानेच आलो आहे ही गोष्ट लक्ष्यांत असूं द्या.

बाळारामशेटः—हें पहा पांडुतात्या, पुढची कामें कशी तडकाफडकी उरकून दाखवितो इकडे तुमचेही लक्ष्य असूं द्या.

पांडुतात्याः—सर्व तऱ्हेने आपली बाजू राखून संधी साधण्याचे काम जर उरकता आले तर फार मोठा लौकीक साधण्याचे श्रेय पदरी पडेल.

इंग्रज शिपाईः—[दरडावून] तिकडे कोण उभे आहे?

बाळारामशेटः—सेनापती साहेबांच्या भेटीसाठीं होळकरांचे वकील या नात्यानें आम्ही आलो आहोत.

शिपाईः—[बंदूक रोखून] होळकर ? आमचा शत्रू ? असें असताही आपण आमच्या तळाच्या रोखानें इतकें संख्याबल बरोबर घेऊन कसे चालून आला ?

बाळारामशेठः—आम्ही उभारलेल्या समेटाच्या पांढऱ्या निशाणाकडे आपले लक्ष्य गेले नाहीं, असें दिसते.

शिपाईः—असल्या फसवेगिरीचीं सोंगें आमच्यापुढें टिकणार नाहींत. समोर नदीकाठीं नावेतून उतरत असलेले लोक तुमचेच ना ?

बाळारामशेटः—ते सगळेजण आमचे परिचारक असून निःशस्त्र आहेत.

शिपाईः—ते कांहीं नाहीं; आपल्या सर्वांची संख्या इतकी मोठी आहे कीं, आपल्या आगमनाची वार्तादेखील आंत जाऊन सांगणें म्हणजे शिस्तभंग होईल. आपण जसें आला तसेंच नावेंत बसून परत जाण्यास वेळ लावाल, तर आमच्या बंदुकीचा ताशेरा आपले स्वागत करील.

बाळारामशेटः—हे पहा ?

शिपाईः—यापुढें आम्हाला आपला एक शब्द देखील ऐकण्याची गरज नाहीं; आपल्या पुढच्या बोलण्याला बंदुकीच्या गोळीनें आमच्या कडून प्रत्युत्तर दिले जाईल.

पांडुतात्याः—यावेळीं शांततेनें परत माघारी फिरणेंच योग्य होईल. (जातात.)

शिपाई २ राः—होळकराकडील निशःस्त्र लोकाविरूद्ध इतके खवळून आंगावर वस्कन धाऊन जाण्यासारखें असें त्यांनीं तुझें कोणचें घोडे मारले होते ?

शिपाई १ लाः—अरे, तसें नव्हे; एकदां शत्रू म्हटला कीं तेथें दयेला आणि मायेला मुळींच थारा नाहीं. अरे, पण नावघाटाकडे पाहिलेस काय ? आतां नावेतून उतरलेली ही दुसरी टोळी नवीनच दिसते.

शिपाई २ राः—पुढें येणारा माणूस हा दुसरा तिसरा कोणी नसून शीखांचा सरदार फत्तेसिंग अहुलियावाला दिसतो.

शिपाई १ लाः—अरे वा: ! शीख सरदाराबरोबर आलेला लवाजमा आज बराच फुगलेला दिसत आहे ?

(फत्तेसिंग प्रवेश करतो)

फत्तेसिंगः—सेनापती साहेबाकडेस आमच्या आगमनाची बातमी तावडतोब कळवा. अमृतसर दरबारकडून खिलत–नजराणा घेऊन वकील आले आहेत; आणि यासाठीं भेट जितक्या लवकर होईल तितके चांगलें.

शिपाई १ लाः—आपण आपल्या मंडळीसह शेजारच्या तंबूत जाऊन विश्रांती घ्या. आपल्या आगमनाची वार्ता सेनापतीसाहेबांना तावडतोब कळवितो. (सर्व जण जातात.)

(पडदा उघडतो. लेक आणि मालकम[1] बोलत बसले आहेत.)

मालकमः—झिंदच्या भागसिंहाकडून बातमी आणणारा माणूस काल छावणींत आला; शिखांच्या खालसा दरबारच्या धोरणावर त्याच्या बातमीनें लख्ख प्रकाश पडला आहे; रणजितसिंहाला

१ मालकम स्कॉच होता. खि. शक १७६९ त त्याचा जन्म झाला. ईस्ट इंडिया कंपनीने त्याला खि. शक १७८३ त मद्रासला चाकरी दिली. खि. शक १७९२ त तो स्वदेशी गेला. एतद्देशीय भाषांचें ज्ञान त्यानें संपादन केले होते. तो मोठ्या तैल बुद्धीचा आणि टिपण्या असल्याने त्याचे असामान्यत्व लवकरच प्रकट झाले. राजकारण लढवून ब्रिटिशांचे चिरस्थायी साम्राज्य कसे स्थापन करता येईल याची त्याला चिंता लागली होती; सैनिक व्यवसायापेक्षां परत आल्यावर त्याला मुख्य सेनापतीच्या जवळ चिटणीसाची जागा लाभली. परत

एकाकी गांठून यशवंतराव होळकराने तेथें आपला जम बसविला; पण अमीरखानाचे यशवंतरावाशी भांडण झालें; आपले सैन्य घेऊन तो त्याच्यापासून निराळा झाला. होळकरांच्या सैनिकामध्यें लढाईस तोंड देण्याच्या आवेशाला भरते आले आहे. तथापि खानाचे

येतांना वाटेत मालकमनें गुडहोप भूशीराजवळ डच लोकांचा पराजय झालेला पाहिला; तेव्हापासून जमविलेली दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटिश साम्राज्याची वडी टिकून आहे. खि. शक १७९५ च्या शेवटीं मालकम मद्रासला उतरला आणि लवकरच त्याची निजामाकडे नेमणूक झाली, तेव्हां त्यानें तेथून फ्रेंचाना हुसकले; खि. श. १७९९ च्या स्वारीत सेनापती सर आर्थर वेल्सलेशी त्याचा परिचय झाला. याच वर्षी मालकम इराणच्या शाहाला भेटला. खि. शक १८०२ जुलै ते नोव्हेंबर मालकम मुंबईत होता. गव्हर्नर जनरलास समक्ष भेटून आपले विचार व्यक्त करण्या-विषयींचे मालकमचें १८०३ फेब्रुआरी दिनांक २७ चे पत्र पहा. बाजीरावाची मे दिनांक १३ ला पुण्यात स्थापना होत असतां माल-कम वेल्सलेच्या सैन्याबरोबर तेथें होता. डिसेंबर दिनांक १६ ला माल-कम वऱ्हाडात वेल्सलेच्या तळावर होता. खि. शक १८०४ फेब्रुआरी दिनांक २० ला मालकमची दौलतरावाशीं भेट आणि तह झाला. १८०५ एप्रिल कलकत्त्याहून मालकम शिंद्याकडे गेला आणि लष्करी व मुलकी अधिकार देऊन क्लोजला दक्षिणेंत ठेविले. "सर्जेरावास न काढल्यास मित्रत्वात बाध येईल; नाहीं तर युद्ध पुकारण्यात येईल." अशी तंबी त्यानें शिंद्यास दिली. खि. शक १८०६ च्या तहानंतर माळव्याचे निरिक्षण करण्यास नालछा घाटाजवळ मालकमनें आपले वास्तव्य ठेविले होते. मांडवगडाजवळ असलेल्या त्याच्या कोठीला अद्याप "मालकम कोठी" असे नांव आहे.

[ब्रह्मणि माला—मालकमचे चरित्र पहा.]

सैन्य फुटून निराळे झाल्यानें होळकरांच्या आवेशाचे भरते आपोआपच ओसरेल. खालसा दरबारचे सहाय्य साधण्यासाठीं शीख पंथाची दीक्षा घेण्याचे होळकरानें मान्य केलें; येवढा त्याग करून देखील शीखांचा खालसा दरबार सहाय्य करण्यास जर कचरला तर इस्लाम धर्म स्वीकारून काबूलच्या अमीराचे सहाय्य संपादण्याचे त्याने घोषित केले. या घोषणेनें खालसा दरबारच्या सभासदामध्यें दुफळी झाली; यामुळें रणजीतसिंहाच्या वैयक्तिक मताला अनायसेच महत्व चढले.

लेकसाहेब:—आमच्या माहितीप्रमाणें खानाचे आणि होळकराचे भांडण लटके ठरेल. निरनिराळ्या ठिकाणाहून व्यास-गंगा पार उतरण्यासाठीं शत्रूनें आपले सैन्य विभागण्याची ही युक्ती योजिली आहे. आमच्या या विधानाला पुष्टी देणारा पुरावा म्हणजे त्या कावेबाज खानाने आम्हाला पाठविलेलें पत्र[१] होय. ते पत्र आपल्या वाचण्यांत आले आहे ना ?

मालकम:—त्या आडदांड पेंढाऱ्याची उद्दाम भाषा त्याच्या धंदेवाईकपणाला साजेल अशीच आहे. त्याच्यासारख्या दुधारी लबाड-गुंडांना हाताळणें हें काम सोपें नव्हे. सागर प्रांतात अमीरखानाने जाळपोळ उडविली; आणि पुण्याच्या स्वारीत असतांना त्याच्या मालकाच्या डोळ्यादेखत त्यानें लुटमार करून प्रजेला पिळून काढले. हृदय विदारण करून टाकणाऱ्या या

१ खानाचें पत्र:—या पत्राचा उल्लेख इंग्रजी पत्रव्यवहारांत आढळतो.

पेंढाऱ्यांच्या लूटमारीमुळें महाराष्ट्र हादरला. या योगानें लोकामध्यें होळकरांचा नैतिक अधःपात झाला.

लेकसाहेब:—अधःपात झाला नसेल असें माझें म्हणणें नाहीं. तथापि मोकाट सुटलेल्या या आडदांड गुंडाना शिस्तींत राबविण्यासाठीं कणखरपणाची आवश्यकता असते; आणि तो गुण होळकराच्या आंगीं पुरेपूर भरलेला आहे हें अमान्य करणें अयोग्य ठरेल. कारण या प्रांतातले होळकरांचें आक्रमण लोकांना सलले नाहीं; चारा वैरणाच्या किरकोळ तक्रारींशिवाय त्याच्याविरूद्ध इकडे इतर कसल्याच कागाळ्या नाहींत. रणजीतसिंहाच्या आक्रमक धोरणामुळें यमुना आणि सतलज[1] नद्यांच्या मध्यें असलेलीं शीख संस्थानें भितीनें गडबडलीं आहेत, ही गोष्ट खोटी नाहीं. पण उद्यां जर रणजीतसिंह आपणाविरुद्ध होळकरांच्या सहाय्यास उभा राहिला, तर लढाईच्या प्रसंगीं आपला पक्ष उघडपणें स्वीकारण्यास ही दुबळीं संस्थानें कच खाण्याचाच संभव ज्यास्त आहे. या प्रश्नाला मोठें महत्व आहे; कारण या संस्थानिकांच्या सहाय्याच्या अभावीं आपला दिल्लीचा मार्ग धोक्यात सांपडून आपल्या पिछाडीला पायबंद घालणें शत्रूला सोपें जाईल.

मालकम:—सेनापतीसाहेबांनीं उपस्थित केलेले मुद्दे विचार करण्यासारखे आहेत.

---

१ यमुना आणि सतलज नद्यांच्या मध्यंतरीं पसरलेल्या संस्थानांना Cis-Sutlej-States म्हणतात.

लेकसाहेबः—याहीपेक्षां ज्यास्त स्पष्टपणें सांगावयाचें म्हणजें आपण अडचणींत सांपडलेले आहोत असें म्हणणेंच सयुक्तिक ठरेल. खानाचे पत्र वाचून माझ्या सर्वांगाचा भडका झाला. पण थोडा विचार केल्यानंतर त्याच्या मर्मभेदक शब्दांनी मला जागें केलें. असली उद्दाम भाषा निर्भयपणें आम्हाला लिहिणारा एकतर आमच्यापेक्षां ज्यास्त बलवान असेल, नाहींतर वेडा; वेडा असणेंच ज्यास्त संभवनीय आहे. अमीरखान अर्कट असून बलाढ्य आहे ही गोष्ट मी ओळखतो. व्यासघाट उतरून पुढें जाण्याचा आपला मार्ग अमीरखानाच्या हालचालीनें खुंटला, ही गोष्ट स्पष्ट झाली. या दृष्टीनें हा प्रश्न सोडवितांच पुढचें दृश्य समजण्यास सोपें झालें. शतद्रू आणि व्यासगंगा या नद्यांच्या दोआबांत आपण फसलेले आहोत; आणि ही संधी साधण्यास टपून बसलेला आपला शत्रू आपणाला याच जागीं गाठूं पहात आहे.

मालकमः—रणक्षेत्रासाठीं हीच जागा ठरवून आपणास चकविण्याचा विचार तर शत्रूनें आपल्या मनांत योजिला नसेल ?

लेकसाहेबः—ही गोष्ट संभवनीय वाटण्यास आणखी सबळ कारणें पुढें ठेविता येतील. या दोआबाची रुंदी फार नसून संगमही फार दूर अंतरावर नाहीं; अर्थात तीन बाजूंनी आपण पाण्यानें वेढिलेलें आहोत; तथापि पूर्वेकडे कोट-कांगडा संस्थानच्या बाजूला चढण असून सर्व प्रदेश पर्वतमय आहे.

यदा कदाचित त्या दिशेनें आपणावर चाल करून येण्याच्या कामांत जर शत्रू यशस्वी झाला, तर आपली धडगत नाहीं.

मालकम:—कोंट-कांगडा येथील राजा संसारचंद्र यानें होळकराची डाळ शिजूं दिली नाहीं. होळकरांच्या वकीलांना त्यानें आपल्या राज्याच्या सीमेबाहेर हाकून लावले.

लेकसाहेब:—ही गोष्ट खरी असेल. तथापि संसारचंद्र आपणास अनुकूल होईलच असें कांहीं आपण सांगितलेले मला आठवत नाहीं.

मालकम:—आपल्या वकीलाशीं संसारचंद्र प्रेमानें वागला, येवढ्यानें तो आपणास अनुकूल झाला असें ग्रहीत धरलें तर फशी पडण्याचाच संभव ज्यास्त आहे.

लेकसाहेब:—हें जर खरे आहे असें ग्रहीत धरले, तर अनर्थाला पारावार उरणार नाहीं. होळकरांचे एकादें पथक जर या पर्वतमय दोआबांत दडून बसले असेल, तर ती बातमी तुम्हाला कळविण्यास संसारचंद्र कांहीं बांधलेला नाहीं ?

मालकम:—म्हणजे ? असली एखादी बातमी तुम्हाला समजली कीं काय ?

लेकसाहेब:—तसें नव्हे; कोणत्याही गोष्टीचा खल करीत असतांना सर्व बाजूंनीं साधक बाधक चर्चा करणे हेंच श्रेयस्कर ठरते. शत्रूच्या बाबतींत विचार करतांना हयगय होता कामा नये; हयगय म्हणजे अपयशाची पूर्व तयारीच. म्हणून

आतां रणजीतसिंहाच्या धोरणाचा रोख पाहूनच आपण आपले पुढचे मार्ग आंखणे भाग पडले आहे. माझ्या चर्चेचा भावार्थ आपल्या लक्ष्यांत आला नां ?

मालकमः—होय. मी देखील त्याच विचारात गर्क आहे.

लेकसाहेबः—बरें तर आम्ही आतां आंत जातो.

(जातो)

मालकमः—[स्वगत] आपणाविरुद्ध उलटून होळकर आजच चढाई करील काय ? केव्हां काय घडेल याचा कांहींच नियम नाहीं. आपण आपल्या कडून सावधानता राखली कीं, आपलें कर्तव्य संपले. (मुनशी आंत येतो.)

मुनशीः—शीख सरदार फत्तेसिंग अहुलियावाले यांना बाहेर तंबूत बसविले आहे; त्यांच्याबरोबर खिलत नजराणा आणणारे अमृतसर दरबारचे वकील बसले आहेत. सेनापतीसाहेबांच्या भेटीसाठीं फत्तेसिंगजी फारच उत्सुकता दाखवीत होते.

मालकमः—मुन्शीजी, प्रथम असें करा कीं, सैन्यांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांना इकडे पाठवून द्या; आणि त्यांच्या आगमनानंतर फतेसिंगाला इकडे आणा. त्याच्याशीं बोलाचाली करण्यास कोणाला बसविले आहे ?

मुनशीः—फतेसिंगाजवळ पिट्रोसाहेब बोलत बसले आहेत.

मालकमः—चांगले केले. कामास लवकर लागा.

(मुनशी बाहेर जातो).

मालकम:--[स्वगत] मराठी भाषा बोलणाऱ्या ख्रिश्चन गोऱ्यानीज पैकीं कांहीं लोक फारच हुशार असतात. या अफाट वस्तीच्या हिंदुस्थानातील परप्रांतीय भाषा आत्मसात् करण्यांत हे लोक हातखंडे असतात. यासाठीं असले हुशार लोक जवळ बाळगल्यानेंच आमचा निभाव लागला. ही गोष्ट सत्य आहे. अरे वाः ! हे सगळे जण आलेच ! या, असे बसा !

(इंग्रज सैन्याधिकारी बसतात.)

आर्मस्ट्रांग:--आज्ञेसरशी उपस्थित झालो आहोत.

मालकम:--आपण आला, हें बरें झालें. अमृतसराहून खिलत-नजराणा घेऊन वकील आले आहेत. अरे वाः ! ते देखील सगळेजण येऊन पोहोचलेच. सरदार साहेब, आपण इकडे, असे बसा.

फतेसिंग--सेनापतीसाहेबासाठीं खालसा-दरबारनें खिलत-नजराणा पाठविला आहे.

मालकम:--असल्या औपचारिक दरबारी सन्मानाची आवश्यकता युद्धाच्या प्रसंगीं पटत नसते.

फतेसिंग:--इष्टानिष्टतेची जबाबदारी खालसा दरबारच्या मंत्री मंडळावर आहे. दरबारच्या आज्ञा पालन करणें येवढेंच आमचे कर्तव्य होय. सेनापतीसाहेबांना खिलतनजराणा दिला जातांच पुढील कार्याला चालना देण्याच्या प्रारंभाला सोयीचे होईल.

मालकम:—ते सगळें खरें आहे; पण कांहो सरदार साहेब, दरबारचा सूर कसा वाहत आहे? आपली देखील स्वतःची कांहीं कल्पना असेल कीं नाहीं?

फत्तेसिंगः—सरकार-दरबारची उठाठेव करणें आम्हाला परवडत नाहीं. दरबारनें आज्ञापिलेली कामें रीतसर आटोपली कीं, सर्व गोष्टींचा उलगडा सर्वत्रांस सहजासहजी कळत असतो. यासाठीं कामें तडकाफडकी उरकल्यानें प्रश्नोत्तरांना वाव सांपडत नाहीं. सेनापती साहेबांना आमच्या आगमनाची बातमी जितकी लवकर कळवाल तितकें बरें पडेल.

मालकम:—बरें आहे; सेनापती साहेबांना बोलावणें पाठवितो. (मालकम जातो.)

पिट्रो:—सरदार साहेब, आपणास कामें उरकण्याची बरीच घाई झालेली दिसते. आपणाला आतां नदीपार जाण्याची तर गडबड नाहीं नां?

फतेसिंगः—आतां आम्हाला इकडे याच पार राहण्याची दरबारची आज्ञा झाली आहे. अंगावर येऊन पडलेली कामें एकदा उरकलीं कीं संपलें. मला आतांच जालंधरला[१] जाऊन परत येणें भाग आहे.

पिट्रो:—जालंधरला कांहीं काम आहे कीं काय?

फतेसिंगः—आमच्या सैन्याचा तळ जालंधरच्या आस-

१ सतलज आणि बिआस नद्यांच्या दोआबात जालंधर आहे.

पास पडला आहे; म्हणून मला तिकडे व्यवस्था पाहून येणें भाग आहे; उद्यां सकाळीं येथें परत येईन.

पिट्रो:—झिंदचे भागसिंहजी आपणाला अमृतसरांत भेटले असतील?

फतेसिंग:—आमची त्यांची चुकामुक झाली.

पिट्रो:—आपण मग बोलूं; कारण सेनापती साहेब आले.

(सेनापती आणि मालकम येतात; सर्वजण उभे राहतात; वकील खिलत-नजराणा देतात.)

मालकम:—(फतेसिंगास) सरदार साहेब, आतां आपण आसनावर बसा. दरबारला देण्यासाटीं कलगीं, मोत्याचा तुरा, कंठी, खिलत वगैरे नजराणा बरोबर दिला आहे. याशिवाय एक खासा अरबी घोडा महाराजांना स्वारीसाटीं दिला आहे. त्याच-प्रमाणें आपण देखील शीख दरबारचे प्रतिनिधी आहात, तेव्हां याप्रसंगी आम्हीं देखील आपला सन्मान केलाच पाहिजे.

फतेसिंग:—दरबारचा सन्मान राखल्यानंतर माझ्या वैयक्तिक सन्मानाला महत्व नाहीं.

मालकम:—असें कसें होईल? आपण किती झालें तरी खालसा दरबारचे प्रत्यक्ष प्रतिनिधी आहात; याकरितां खिलत, नजराणा, कंठी आणि पोशाख, शिवाय एक सुंदर पाणीदार अरबी घोडा दरबारप्रमाणेंच आपणाला देखील आमच्या सरकारनें मुद्दाम पाठविला आहे.

(फतेसिंगाला खिलत नजराणा देतात.)

मालकम:—आतां इष्ट कार्याकडे लक्ष्य देणें अवश्य आहे. आपण नुकतांच अमृतसर दरबारचा खलिता सेनापती साहेबांच्या हातांत दिला; खलित्याचे वाचनानंतर त्याचें उत्तर देण्यांत येईल; तथापि खालसा दरबारचे धोरण आमच्यासंबंधी काय आहे.

फतेसिंग:—मला देखील या विषयाचें मोठेंच कोडें पडलें आहे.

मालकम:—म्हणजे ? मला आपल्या म्हणण्याचा उलगडा झाला नाहीं. कृपा करून या गोष्टींचा स्पष्टार्थ आम्हाला सांगाल काय ?

फतेसिंग:—अहो, तसें नव्हें; आम्ही नावेतून इकडे येत असतांना वाटेंत आपण पिटाळून लावलेले होळकरांचे वकील आम्हाला भेटले. आपण केलेल्या त्यांच्या आदरातिथ्याची हकीगत ऐकून माझ्या मनाला धक्का बसला. आपला आणि होळकरांच्या वकीलाचा हरप्रयत्नेंकरून समेट घडवून द्यावा ही आमच्या दरबारची मला निक्षून आज्ञा झाली आहे. असल्या विवंचनेत इकडे येत असतांना होळकरांच्या वकीलांनीं केलेल्या गाऱ्हाण्यानें मला कोडे पडले, यांत नवल कसलें ?

मालकम:—म्हणजे ? अमृतसर दरबारनें होळकरांचा पक्ष घेतला कीं काय ?

फतेसिंग:—असें मी केव्हांच म्हटले नाहीं. आपले वजन खर्ची घालून होळकर-इंग्रज समेट साधून द्यावा अशी दरबारनें

मला स्पष्ट आज्ञा दिली आहे. तडजोडीच्या कामाला निदान आठ-दहा दिवसापेक्षां देखील ज्यास्त दिवस लागण्याचा संभव आहे. होळकरांच्या वकीलाबरोबरचा परिवार फार नसून त्यांच्याकडून शांतता राखली जाईल याबद्दलची हमी मी पत्करतो. वकीलांची मंडळी आपणाजवळच तंबू ठोकून राहतील, या योगानें तहाच्या वाटाघाटीस विलंब लागणार नाहीं. त्यांच्या येण्यासाठीं आपण अनुज्ञा द्यावी म्हणजे सर्व कांहीं सोयीनें जमून येईल.

मालकम:—आपल्या म्हणण्याचा विशेषार्थ आम्हाला कळला नाहीं. जरा स्पष्टार्थानें सांगाल कां ?

फतेसिंग:—[उठून] दरबारच्या खलीत्यांत सर्व कांहीं स्पष्टपणें लिहिले असेल अशी माझी खात्री आहे. आम्ही उदईक जालंदरहून परत आपल्या भेटीसाठीं उपस्थित होऊं. तोपावेतों आमच्या दरबारचे वकील भागसिंगजी येथेच राहतील. (जातात)

मालकम:—[सेनापती साहेबास एकीकडे] आपण देखील पुढची मसलत आतांच निश्चित ठरविली तर बरे होईल.

(पडदा पडतो)

(होळकरांचे वकील प्रवेश करतात.)

बाळारामशेट:—टोपीवाल्याशी तहाची घासाघीस करण्यांत आज बारा दिवस लोटले; अखेर उभयपक्षीं तहं मंजूर

---

१ खि. शक १८०६ जानेवारी दिनांक ६ ला झालेल्या व्यास घाटच्या तहनाम्यावर हबीबउल्ला आणि बाळाराम शेट आगरवाल वाणी यांनीं स्वाक्षऱ्या केल्या हे त्या.

झाल्यानें आनंदी आनंद झाला. पांडुतात्या, आपण मात्र तोंड आंबट झाल्याप्रमाणें दर्शवीत आहात.

पांडुतात्याः—[रागानें] वाडवडिलांनी रक्त सांडून मिळवून ठेविलेली दक्षिणेतली वतनें[1] आपण आज गमावली; टोंक-रामपुरा घालवून बसलो. आणि यापुढें सातपुड्याखालीं ससैन्य केव्हांही न उतरण्याची मान्यता देणाऱ्या या मुस्कट दाबीला आपण तह म्हणतां ?

हबीबउल्लाः—आपले सैन्य येथून सुरक्षितपणें परत मालव प्रांतात जाऊन स्वस्थपणी बसूं द्यावें, यासाठीं आम्हीं झगडलो; म्हणून ही सवलत आपणाला मिळाली. हे काय थोडे झालें ?

बाळारामशेटः—दक्षिणेतील वडिलोपार्जित पाटीलकीची उत्पन्नें आणि टोंक-रामपुरा[2] दोन वर्षांनीं परत मिळणार. ह्या गोष्टी तुमच्या लक्ष्यांत आल्या नां ?

पांडुतात्या—अहो ! माझ्या ते सर्व कांही चांगलेच लक्ष्यांत आले आहे. पण सुसरीनें गिळलेले माणीक परत हातीं

---

१ चांदवड, वाफगांव, लासलगांव, आंबड वगैरे बऱ्याच जागा होळकरांना जहागिर होत्या; तसेच पाटिलकांसारखे अनेक हक्क त्यांच्याकडे होते.

२ टोंक-रामपुरा:– हें ठाणें अहल्याबाईच्या राजवटीतच होळकराकडे आले होते. सैन्याच्या खर्चासाठीं टोंक-रामपुऱ्याचे उत्पन्न अमीरखानाकडे लाविले होते. खि. शक १८१८ त मंदोसरच्या तहान्वयें अमीरखान टोंक-रामपुऱ्याचा पहिला नबाब झाला. तेव्हांपासून टोंक-रामपुरा या संस्थानचे प्रमुख ठाणें आहे.

आलेले क्वचितच दृष्टीस पडते. तसेंच अंतर्वेदीतील[1] आपल्या जहागिरींना लेखणीच्या एका फटकाऱ्यानें आपणास मुकावे लागले. ह्या गोष्टी काय दर्शवितात ?

बाळारामशेटः—येवढें जरी आपण गमावलें असें दिसत असलें तरी महाराजांच्या आज्ञेप्रमाणें निदान संस्थानिकांच्या[2] बाबतींत आपण पक्केपणीं बोलून घेतले आहे. शीख दरबारनें लगट केल्यानेच तडजोड यशस्वी झाली. हा शिखांचा-शह जलचरांना दिल्यामुळें महाराजांच्या अंगीं असलेले राज्यव्यवहाराचें कौशल्य सर्वांच्या चांगलेच प्रत्ययास आले.

पांडुतात्याः—हा शिखांचा शह अर्धवट लागल्यानें लंगडा ठरला; कारण शीखांचे सहकार्य साधले असते तर इच्छित कार्य सहजासहजीं साधून घेणें आंवाक्याबाहेर नव्हते.

हबिबउल्लाः—टोपीवाल्यांनीं धूर्तपणानें ही गोष्ट आधीच हेरून ठेविली होती; म्हणून त्यांनीं तहाचे घोंगडे भिजत पडूं दिले नाहीं.

बाळारामशेटः—आणि म्हणूनच तह झाल्यानें आनंदी आनंद झाला, येवढेच माझे म्हणणें आहे.

---

१ अनुपशहर, डिबई वगैरे अंतर्वेदींतील ठाणीं होळकरांच्या सत्तेखालीं होतीं.

२ " तहाचे वेळीं संस्थानिकांविषयीं पक्केपणीं बोलून घेतले आहे." यशवंतरावाचे पत्र नं. ९६ पहा

अ. ना. भागवतः-पत्रव्यवहार पूर्वार्ध भाग १ ला पान १४९ पहा.

पांडुतात्या:—मुनशी आणि पिट्रो साहेबांच्या तंबूजवळ आपण येऊन पोहोंचलो; आतां तहाची चर्चा झाली इतकी पुरे झाली. त्यांच्याजवळून सेनापतीसाहेबांची स्वाक्षरी केलेला तहाचा कागद हातीं पडला कीं काम आटोपलें. (जातात.)

(मुनशी आणि पिट्रो बोलत आहेत.)

मुनशी:—होळकराशीं येवढी खर्चाची मोहीम, दीड-दोन वर्षें लढून देखील, प्रत्यक्ष लाभ असा कांहींच झाला नाहीं.

पिट्रो—आमच्या साहेबाला दूरदर्शी म्हणणेच योग्य होईल. आपल्या बुद्धीबळाच्या सामर्थ्यावर आपलीं पुढचीं धोरणें जोखून साहेब आपला कार्यक्रम आखून ठेवीत असतो; म्हणून त्यांत सहसा फेरबदल करावा लागत नाहीं. ही गोष्ट उपेक्षिण्यासारखीं नसून मान्य करणें भाग आहे. आज कांहीं देखील पदरांत पाडून न घेतां कचाट्यांत धरलेल्या होळकराला आपल्या राज्यांत सुखासुखी परत जाऊन शांततेत बसूं देण्याच्या अटींना, कंपनी सरकारनें कोणत्या हेतूनें मान्यता दिली? यातले इंगित भविष्यकाळच दर्शवील. (जासूद येतो.)

जासूद:—होळकरांचे वकील भेटीसाठीं बाहेर उभे आहेत.

मुनशी:—त्यांना आंत येऊं द्या.

(जासूद जातो; वकील येतात.)

पिट्रो:—वकील साहेब, या; असे बसा. आम्ही आपलीच वाट पाहात होतो.

बाळारामशेट:—महाराजांची स्वाक्षरी तहनाम्यावर झाली ते कागद आपणाकडेस कालच पाठविले. सेनापती साहेबांची स्वाक्षरी तहनाम्यावर अद्याप झाली नसेल या समजुतीनें आम्हाला वेळ झाला.

मुनशी:—तहनाम्यावर स्वाक्षरी करून सेनापतीसाहेब सैन्यासह आज पहाटेच्या रात्री परत फिरले. ठरल्याप्रमाणें दोन टप्प्याचे अंतर राखून आपण चालूं लागला म्हणजे आमचा एक माणूस देखील या बाजूला मागें राहणार नाहीं.

हबिबउल्ला:—आपले सैन्य पाठीवर असतांना आम्ही आमचा पाय उचलणार नाहीं. आपले सर्व सैन्य निघून गेलेले आढळतांच ठरवून दिलेल्या अटीप्रमाणें दोन टप्प्याचे अंतर राखून आमचे सैन्य कूच करून मागें परत वळेल.

पिट्रो:—खानसाहेब, असा समजुतीचा घोंटाळा होऊं देऊं नका. आमचे सर्व सैन्य आजच माघारी परत फिरलें. यशवंतराव महाराजांना खिलत, नजराणा, हत्ती, घोडा, मोत्याचा कंठा, कलगी वगैरे पोहोचविण्यास पाठविलेले आमचे लोक मागें परत येतांच आम्हाला देखील मागें थांबण्याची मुळींच आवश्यकता नाहीं.

बाळारामशेटः—ती गोष्ट लक्षांत येतांच वेळ मोडू नये म्हणून खिलत नजराण्याचा स्वीकार करण्यासाठीं अमृतसराहून तीन टप्पे महाराज अलीकडे उतरून आले आहेत.

हबिबउल्लाः—तहनाम्याचे कागद बाळाराम शेटजीकडे सोंपविले कीं आमचे काम संपलें.

(मुनशी तहनाम्याचे कागद देतात.)

पिट्रोः—एकंदरीने या होळकर प्रकरणाचा शेवट गोड झाला. (जातात)

(यशवंतराव आणि हरनाथदादा प्रवेश करतात.)

यशवंतरावः—हरनाथ ? टोपीवाल्याचे सर्व सैन्य परत फिरले किंवा नाहीं ?

हरनाथः—व्यासघाटाहून टोपीवाल्यांचे सैन्य दिल्लीकडे गेले.

यशवंतरावः—आता तुम्ही सर्व सैन्यासह सावधानतेने माळवा प्रांताची वाट चालूं लागा. आम्ही सैन्याबरोबरच आहोत असे सर्वत्रास भासवा; आम्ही आतां ज्वालामुखीचे दर्शन करून तुम्हाला वाटेतच गांठतो.

हरनाथः—या आणीबाणीच्या प्रसंगी महाराजांचे सानिध्य दूर अंतरावर असणार; आणि शत्रू पाठीवर असल्यानें मन डगमगले नाहीं म्हणजे मिळवली.

यशवंतरावः—शत्रूशी सामना बांधून तोंड देण्यास मन कचरते ? क्लीबत्वाला शोभणारी असली अभद्र वाणी आमच्या

सहवासाशी परिचित असलेल्या हरनाथाच्या तोंडीं मुळींच शोभत नाहीं. ज्वालामुखी क्षेत्रस्थानाच्या इतक्या जवळ येऊन मातोश्रीच्या दर्शनाशिवाय परत फिरणें योग्य नव्हें. तसेंच कोट-कांगडा येथें संसारचंद्राची भेट होईल; याशिवाय इतरही अनेक राजकारणें गुंतलेली आहेत. आम्ही तिकडे येऊन पोहचल्यावर पुढचे प्रश्न सोडविण्यास सोयीचे होईल. तुमचे आमचे रक्षणाची काळजी वाहण्यास तो जगन्नियंता मल्हारी-म्हाळसाकांत श्री मार्तंडराजच समर्थ आहे. [पडदा पडतो.]